रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३१
www.ramprahar.com

# राम प्रहर

रविवार १७ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



अंतरंग

इस्लामपूर येथे शैक्षणिक वास्तूंचे उद्घाटन/२
रविवारनिमित्त विविध विषयांवरील लेख/४, ६
जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात/८

# १० थरांचा विश्वविक्रम

**ठाणे : संस्कृती युवा प्रतिष्ठानतर्फे आयोजित दहीहंडी उत्सवात जोगेश्वरीच्या कोकण नगर गोविंदा पथकाने १० थर लावून विश्वविक्रम केला. त्यांनी जय जवान गोविंदा पथकाचा विक्रम मोडला. यानंतर 'जय जवान'नेही घाटकोपर येथील दहीहंडी उत्सवात यशस्वीपणे १० थर रचले.**

ठाण्याला दहीहंडीची पंढरी म्हणून ओळखले जाते. शहरातील वर्तकनगर भागात राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवात सकाळपासूनच मुंबई, ठाण्यातील पथके थर रचण्यासाठी येत होती. यामध्ये शनिवारी दुपारीच बाजी मारली ती जोगेश्वरी येथील कोकण नगर गोविंदा पथकाने. या पथकाने तब्बल १० थर रचले. ३८ वर्षीय विवेक कोचरेकर हे या पथकाचे प्रशिक्षक आहेत. मागील १२ वर्षांपासून ते पथकात कार्यरत असून काटेकोरपणे प्रशिक्षण देत आहेत.

यानंतर काही वेळातच घाटकोपर येथे मनसे गणेश चुक्कल, अरविंद गिते मित्र परिवार आयोजित दहीहंडी उत्सवात जय जवान गोविंदा पथकानेही १० थर रचले. जय जवान पथकाला गोविंदा पथकांमधील उपनगरचा राजा म्हटले जाते. त्यांना मागे टाकत कोकण नगर गोविंदा पथकाने ठाण्यातील दहीहंडीत १० थरांचा विश्वविक्रम रचला होता. या विक्रमाने जय जवान पथकाला पिछाडीवर टाकले होते, पण काही तासांतच जय जवान पथकाला तोच विक्रम करण्यात यश आले.




# गोविंदा रे गोपाळा..!

## दहीहंडी उत्सवाला वरुणराजाची दमदार साथ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कृष्णजन्माष्टमी आणि दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. लाखमोलाच्या राजकीय दहीहंड्याची रेलचेल यंदाच्या गोविंदोत्सवाचे आकर्षण ठरली. विशेष म्हणजे वरुणराजाने गोविंदांना दमदार साथ देत त्यांचा उत्साह वाढवला. रात्री उशिरापर्यंत दहीहंडीचा थरार सुरू होता.

शुक्रवारी रात्री जन्माष्टमी सोहळा सर्वत्र पारंपरिक पद्धतीने आणि धार्मिक वातावरणात झाला.





यानिमित्ताने कथा, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. जन्माष्टमीचे औचित्य साधून काही ठिकाणी सप्ताह पार पडले.

दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारी सकाळपासून गोविंदांचे जथ्थेच्या जथ्थे शहरात आणि गावागावात फिरत असल्याचे चित्र पहायला मिळाले. 'तुझ्या घरात नाही पाणी घागर, रिकामी रे गोपाळा' म्हणत ढोल-ताशांच्या तालावर गोविंदा नाचत होते. 'मच गया शोर सारी नगरी रे...', 'गोविंदा आला रे आला...', 'ढाऽऽक्कुमाकूम... ढाऽऽक्कुमाकूम' यांसारख्या हिंदी-मराठी गाण्यांवर नाचणारे गोविंदा लाल, पिवळ्या, पोपटी रंगाचे टी-शर्ट घालून कपाळाला पट्टी बांधून दहीहंडी फोडण्यासाठी मोठ्या संख्येने फिरत होते.

पनवेल, उरण, अलिबाग, पेण, सुधागड-पाली, रोहा, पेझारी, झिराड, खोपोली आणि कर्जत येथे लाखमोलाच्या दहीहंड्याचे आयोजन करण्यात आले होते. १६२ ठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्या.

रायगड जिल्ह्यात आठ हजार ९७९ दहीहंडी फोडण्यात आल्या. त्यात एक हजार ९१७ सार्वजनिक, तर सात हजार ६२० खासगी हंड्यांचा समावेश होता. जिल्ह्यात ठिकठिकाणी राजकीय पक्षांनी दहीहंडी प्रायोजित केल्या होत्या. अगदी पन्नास हजारांपासून सात लाख रुपयांचे बक्षीस; त्यासोबत इतर आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती. अलिबाग, पेण, पनवेल, उरण, रोहा आदी तालुक्यातील राजकीय पक्षांच्या दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदांनी चार-पाच थराच्या सलामीपासून अगदी सात-आठ थराचे मानवी मनोरे उभारले होते.

## पनवेलमध्ये सोसायटी मित्र मंडळाचा दहीहंडी उत्सव जल्लोषात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'गोविंदा रे गोपाळा, यशोदेच्या तान्ह्या बाळा' अशा जयघोषात पनवेलमध्ये सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने दहीहंडी उत्सव जल्लोषात साजरा झाला. या उत्सवात मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील रहिवाशी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. यामध्ये महिला आणि लहान मुलांचा उत्साह पाहण्यासारखा होता.

आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अनिवाश कोळी आणि माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी या उत्सवात सहभागी होऊन दहीहंडी फोडलेल्या मंडळांना तसेच लहान मुलांना सन्मानचिन्ह देऊन त्यांना प्रोत्साहित केले. दहीहंडीदरम्यान वरुणराजाचे हजेरी लावल्यामुळे गोविंदांचा आनंद द्विगुणीत झाल्याचे दिसून आले.



सोसायटी मित्र मंडळाची हंडी फोडण्याचा मान पनवेल कोळीवाडा येथील गोविंदा पथकाला मिळाला. त्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. (पान २ वर..)



### गोविंदा पथकांचा गौरव



**उरण : आमदार महेश बालदी मित्र मंडळाच्या वतीने शहरातील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी शाळेच्या प्रांगणात दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी सलामी देणाऱ्या व विजेत्या गोविंदा पथकांना आमदार महेश बालदी यांच्या हस्ते गौरविण्यात आले.** **(वृत्त पान ३ वर..)**

## मुंबईत गोविंदाचा मृत्यू, अनेक जखमी

**मुंबई : प्रतिनिधी**

मानखुर्द परिसरात बाल गोविंदांसाठी दहीहंडी बांधणाऱ्या एका गोविंदाचा पडून मृत्यू झाला. याशिवाय ठिकठिकाणी दहीहंडी फोडण्यासाठी रचलेल्या थरांवरून कोसळून अनेक जण जखमी झाले.

मानखुर्दच्या महाराष्ट्र नगर परिसरात बाल गोविंदांसाठी दुपारी ३च्या सुमारास दहीहंडी बांधत असताना जगमोहन शिवकिरण चौधरी (वय ३२) हा पहिल्या मजल्यावरून खाली पडला. त्याला तातडीने गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याखेरिज इतर ठिकाणी गोविंदा जखमी झाले. त्यांच्यावर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.

## अलिबागमधील कुर्डुस गावात विहिरीवरच्या दहीहंडीचा थरार

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील कुर्डुस गावात यंदाही आगळ्यावेगळ्या दहीहंडीचा थरार पहावयास मिळाला. इथे विहिरीवर उंच दहीहंडी बांधून ती फोडण्याची गेल्या ३३ वर्षांपासूनची परंपरा आहे. याला विहिरीवरची दहीहंडी म्हणतात. ही हंडी पाहण्यासाठी आजुबाजूच्या गावातील नागरिकांनीही गर्दी केली होती.

१९९२ साली कुर्डूस गावातील देऊळआळी परिसरातील पिंगळे, पाटील, शेरमकर, थळे आणि केणी या कुटुंबातील धाडसी तरुणांनी काहीतरी वेगळे करावे अस वाटले. यातूनच या तरुणांना विहिरीवर दहीहंडी फोडण्याची भन्नाट करण्याची कल्पना सुचली.

सुरुवातीला सीताफळाच्या झाडाचा आधार घेत दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न झाला, पण नंतर विहिरीच्या कठड्यावर थर रचून त्यावरून उडी मारून दहीहंडी



फोडण्याची पद्धत रूढ झाली. या दहीहंडीचे खास वैशिष्ट्य म्हणजे गोविंदाने दहीहंडीला हात लावला की, ती फुटली असे मानले जाते. म्हणजे प्रत्यक्षात ही दहीहंडी थेट फोडली जात नाही, तर तिला फक्त स्पर्श केला जातो. यानंतर ही दहीहंडी खाली उतरवून विहिरीत फोडली जाते. गोविंद पथकातील सर्व सदस्य विहिरीत उडी मारून जल्लोष साजरा करतात. विशेष म्हणजे, या थरारात आजवर कोणालाही दुखापत झाली नसल्याचे ग्रामस्थ सांगतात.

या वर्षी तालुक्यातील १० गोविंदा पथके ही हंडी फोडण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करीत होते. गावातील आकाश पिंगळे याने यंदा सलग सातव्यांदा ही हंडी फोडत विजेतेपद पटकावले. विजेत्या गोविंदांना गदा आणि चषक देऊन सन्मानित करण्यात आले. यंदा या ठिकाणी हंडीचा थरार पाहण्यासाठी अनेकांनी हजेरी लावली होती. गावकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

# इस्लामपूर येथे शैक्षणिक वास्तूंचे उद्घाटन; मान्यवरांची उपस्थिती

**सांगली : रामप्रहर वृत्त**

सांगलीतील इस्लामपूर येथे महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित प्रा. डॉ.एन.डी. पाटील विधी महाविद्यालय, श्रीमती सरोज पाटील मानसशास्त्र संशोधन केंद्र आणि डॉ. एन.डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचे उद्घाटन शनिवारी (दि. १६) मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

या सोहळ्याला उपमुख्यमंत्री अजित पवार, सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील, आमदार रोहित पवार, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, दिवंगत प्रा. डॉ.एन.डी. पाटील यांच्या पत्नी व संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या वेळी डॉ.एन.डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहासाठी जिल्हा योजना अनुदानातून १० कोटी रुपये देण्याचे आश्वासन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. त्याचप्रमाणे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एक कोटी रुपयांची, तर आमदार रोहित पवार यांनी ४० लाख रुपयांची देणगी जाहीर केली.





# नेणवली शाळेत निपुण हंडी उपक्रम

## पारंपरिक हंडीला आधुनिक अन् अभ्यासपूर्ण दहीहंडीचे स्वरूप

**पाली : प्रतिनिधी**

गोपाळकाला निमित्ताने नेणवली शाळेत पारंपरिक हंडीला आधुनिक व अभ्यासपूर्ण 'निपुण हंडी'चे स्वरूप देऊन एक अनोखा उपक्रम शनिवारी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

या उपक्रमात, हंडीमध्ये नेहमीच्या लाह्या आणि चॉकलेट्स सोबतच पेन, पेन्सिल, खोडरबर, शार्पनर अशी शैक्षणिक साहित्य आणि निपुण पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यावरील प्रश्नांच्या चिठ्ठ्या ठेवण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी ही हंडी फोडल्यानंतर पडलेले साहित्य गोळा केले. ज्याला जी चिठ्ठी मिळाली, त्या चिठ्ठीतील प्रश्नांची उत्तरे दोन गटांमध्ये विभागून विद्यार्थ्यांनी दिली. या स्पर्धेत ज्या गटाने जास्त प्रश्नांची अचूक उत्तरे दिली, तो गट विजयी ठरला.

या अभिनव उपक्रमामुळे मुलांनी अभ्यासासोबतच खेळण्याचा आनंद घेतला आणि तो दिवस 'आनंददायी शनिवार' म्हणून साजरा झाला. शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेंद्र अंबिके यांनी 'निपुण हंडी'चे महत्त्व मुलांना समजावून सांगितले. उपशिक्षकांनी गणपत वरगडे आणि पदवीधर शिक्षक. शंकर जाधव यांनी या संपूर्ण उपक्रमाचे यशस्वी नियोजन आणि तयारी केली.हा उपक्रम पर्यावरणाची काळजी घेणारा आणि शिक्षणाचा आनंद देणारा असल्याने, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# महाडमध्ये मुसळधार पावसात गोविंदा पथकांचा उत्साह कायम

**महाड : प्रतिनिधी**

श्रीकृष्ण जन्माष्टमी गोपाळकाला साजरा होत असताना संपूर्ण जिल्ह्यात मुसळधार पाऊस कोसळला. या वेळी गोविंदा पथकांचा उत्साह मात्र कायम होता. महाड शहरामध्ये तसेच ग्रामीण भागामध्ये पारंपारिक पद्धतीत आणि गोविंदा पथकांचे थर लावून दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांची चढाओढ लागली होती. मात्र खरी चढाओढ तर मंत्री गोगावले यांच्या व राष्ट्रवादीच्या तटकरे यांच्या दहीहंडीत पहायला मिळाली.

महाड तालुक्यामध्ये गेली दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. आज सकाळपासूनच मुसळधार पावसाने संपूर्ण तालुक्याला चांगलेच धुतले आहे. यामुळे गेली महिनाभरापासून जाणवत असलेल्या उष्म्यापासून आज काहीसा दिलासा मिळालेला आहे. शिवाय पाऊस पडल्यामुळे भविष्यातील पाण्याची चिंता देखील मिटली आहे. आज गोपाळकाला असल्याने संपूर्ण तालुक्यामध्ये तसेच शहरांमध्ये गोकुळाष्टमीचा उत्सव संपूर्ण जल्लोषात साजरा झाला आहे. या जल्लोषावर पावसाचे पाणी पडत असल्याने जल्लोषांमध्ये भर पडली आहे. मुसळधार पाऊस पडत असला तरी दहीहंडी फोडण्यासाठी गोपाळांचा उत्साह मात्र कायम राहिला आहे.

महाड तालुक्यामध्ये आजही प्रत्येक गावामध्ये पारंपारिक पद्धतीने दहीहंडी साजरी केली जाते. भजन कीर्तनाबरोबरच पारंपारिक नृत्य मधून गोपाळकाला साजरा केला. ढोल ताशांच्या गजरामध्ये नृत्य करत गोकुळाष्टमी साजरी करण्यात आली. महाड शहरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने १,५५,५५५/- आणि शिवसेनेच्या ना भरतशेठ गोगावले मित्र मंडळाच्या वतीने १,५१,०००/- असे भव्य बक्षीस लावून दहीहंडी चे आयोजन करण्यात आले होते. या वेळी दस्तुरखुद्द मंत्री भरतशेठ गोगावले, विकास गोगावले व मंत्री अदितीताई तटकरे, स्नेहल जगताप ह्या महाडमधील या दहीहंडीला उपस्थित होते.



# पेण उपकोषागार अधिकारी वैशाली शिर्के यांचा मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते गौरव

**पाली : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री १०० व १५० दिवसीय कार्यालय सुधारणा कार्यक्रमात पेण कोषागार अधिकारी वैशाली संदीप शिर्के यांच्या कुशल कार्यप्रणाली व गुणवत्तापूर्ण कामगिरीने कार्यालयाचा जिल्ह्यात पहिला आणि विभागात दुसरा क्रमांक प्राप्त झालाय.

राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे या उद्देशाने १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिम हाती घेण्यात आली होती. गुणवत्तापूर्ण कार्यासाठी पेण उपकोषागार कार्यालयाच्या कोषागार अधिकारी वैशाली शिर्के व सहकाऱ्यांचा देशाच्या स्वातंत्र्यदिनी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



यावेळी रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषद मुख्याधिकारी नेहा भोसले, जिल्हा रायगड कोषागार अधिकारी दीपक बोडके तसेच अप्पर कोषागार अधिकारी दामले , अप्पर कोषागार अधिकारी देवेंद्र पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते.

ही केवळ व्यवस्थापन मोहीम नाही तर आपल्या कर्तव्याप्रती उत्तरदायित्व, जनहीताची भावना, पारदर्शकता आणि लोकहितासाठी कार्यक्षम प्रशासनाचे प्रतिबिंब आहे. लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात अग्रेसर राहून या उत्कृष्ट अधिकाऱ्यांनी इतरांसमोर आदर्श निर्माण केला आहे, असे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

या पुरस्कारामुळे भविष्यात अधिक लोकाभिमुख, पारदर्शक कारभार करण्याची प्रेरणा मिळाली असल्याचे श्रीमती शिर्के यांनी सांगितले.

# वीजवाहक तार अंगावर पडून वृद्ध महिलेचा मृत्यू

**खालापूर, चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील गावडे जांभिवली या गावातील वृध्द महिला सुलोचना दत्तात्रेय गावडे ६५ या पहाटे घराच्या पाठीमागे प्रातर्विधी जात असताना विद्युत पुरवठा तार अंगावर पडून विजेचा शॉक बसला व त्या जागेवरच कोलमडल्या.



सुलोनचा गावडे यांच्या नातवाला व गावकऱ्यांना याची माहिती लागताच वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना खबर देताच त्यांनी त्वरित विज पुरवठा खंडित केला, मात्र तोपर्यंत फार उशीर झाला होता. घटनास्थळी खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार व पोलीस कर्मचारी, वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता महादेव मुंढे, सहाय्यक वितरण अभियंता योगेश देसाई व कर्मचारी दाखल झाले.

जांभिवली ग्रामस्थांनी मागील ३० /३५ वर्षे पुर्वीच्या जीर्ण झालेल्या तारा बदलण्यात याव्यात यासाठी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती, मात्र वीज वितरण कंपनीच्या अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे लक्ष न दिल्याने ही घटना घडली असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे असुन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करीत सुलोचना दत्तात्रेय गावडे यांच्या कुटुंबाला आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणीही केली जात आहे

# स्वातंत्र्य दिनानिमित्त पेण मंडळातील विविध विभागात ग्रामसभा उत्साहात

**पेण : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारच्या पी.एम. सुर्यघर योजना, पी.एम. कुसुम योजनेची माहिती रायगड जिल्ह्यात असलेल्या वीज ग्राहकांना देण्यासाठी स्वातंत्रदिनानिमित्त दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी महावितरण पेण मंडळ कार्यालयाकडून विविध ठिकाणी मेळावे घेऊन मार्गदर्शन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात अधीक्षक अभियंता, पेण मंडळ श्री. बिक्कड यांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाली. तसेच, पेण मंडळ परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्याचप्रमाणे अलिबाग येथील सावरसई, सपोळा गावात, पनवेल ग्रामीण येथील खीरखिंडी गावात, रोहा येथील रोहा, तांबडी,मोरभा, लोंशी व वाली तसेच गोरेगाव विभागातील दिघी, महाड व इतर एकूण १५ गावांमध्ये झालेल्या ग्रामसभेत पंतप्रधान सूर्य घर मुफ्त बिजली योजना, मॉडेल सोलर विलेज व महावितरणच्या इतर योजनांचे सादरीकरण करण्यात आले व सर्वसाधारणपणे या सर्व ग्रामसभेमध्ये लोकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. तसेच, योजनेमध्ये सामील होण्यासाठी लोकांनी सकारात्मक चर्चा केली. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने वृक्षारोपणाच्या दिलेल्या उद्दिष्ट पूर्तीसाठी १५ ऑगस्ट पर्यंत ३०० झाडांचे वृक्षारोपण मंडळामध्ये विविध कार्यालयामार्फत करण्यात आले. राहिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी २० ऑगस्टपर्यंत ठिकठिकाणी वृक्षारोपण करायचे नियोजित केलेले आहे.

मुख्य अभियंता भांडुप परिमंडल श्री. संजय पाटील, अधीक्षक अभियंता, पेण श्री. धनराज बिक्कड यांच्या मार्गदर्शनखाली कार्यकारी अभियंता, सर्वश्री. प्रदीप दाळू, रामकृष्ण पाटील, शैलेश कुमार व विद्यासागर शिंदे यांनी ग्रामसभा घेऊन ग्राहकांना योजनांची माहिती देण्यासाठी धडक मोहीम राबिवली.

पान १ वरून

## पनवेलमध्ये सोसायटी मित्र मंडळाचा दहीहंडी उत्सव जल्लोषात

या उत्सवास प्रमुख मान्यवरांसह उद्योजक राजू गुप्ते, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज, उल्हास झुंझारराव, भाजप पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, सुदर्शन पॉल, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, गिरीश जगे, प्रवीण मोरबाळे, अमेय देशमुख, आदित्य देशमुख, संतोष कुवर, संदीप पाटील, स्वरूप वाणी, जयदीप पाटील, राजू पुरोहित, प्रद्युम्न कुठले, अपूर्व ठाकूर यांच्यासह मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळा तालुक्यात ढाक्कुमाकुमच्या गजरामध्ये गोविंदांचा जल्लोष

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात १५ ऑगस्ट रोजी जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात रात्रभर भक्तीभावाने पारंपारिक पध्दतीने साजरा करत दुसऱ्या दिवशी १६ ऑगस्ट रोजी सकाळी १२ वाजल्यापासून ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत गोविंदाचे आगमन झाले. गावागावातून खालु बाज्या वरती ढाकमुकूमच्या आवाजात गोविंदा रे गोपाळा म्हणत गोविंदे आनंदाने प्रत्येक गावात व तळा शहरात ही आनंदाने निघाले.ज्या भागातील गोविंदे होते त्यांनी त्यांच्या भागातील दहीहंडी फोडत मोठ्या उत्साहात हा गोपाळ काळा उत्सव साजरा केला.

प्रत्येक गोविंदाच्या चेहऱ्यावरती एक वेगळा आनंद दिसत होता.लहानां पासून ते वयोवृध्दही मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्याचे पहावयास मिळत होते. अनेक ठिकाणी पारंपारिक पध्दतीने जणूकाही आध्यात्मिकतेचे एक अनोखे असे दर्शन या गोविंदाच्यातून घडत होते. दहीहंड्या काही ठराविक ठिकाणी तीन ते चार थरांपर्यंत बांधल्या होत्या.



# भारतीय बंदरांचा विशिष्ट सुरक्षा प्रशिक्षण अभ्यासक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय बंदरांच्या विशिष्ट सुरक्षा आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे,हा कोर्स दिनांक १४ ते २९ ऑगस्ट २०२५ दरम्यान होणार आहे .

यामध्ये श्री पद्माकर संतू रणपिसे, आयपीएस अतिरिक्त महासंचालक (दक्षिण) नवी मुंबई, श्री उन्मेष शरद वाघ (जेएनपीए अध्यक्ष), श्री अभिषेक गोयल, आयपीएस, महानिरीक्षक, नवी मुंबई, श्रीमती ममता आयआरएस राहुल, आयपीएस, उपमहानिरीक्षक नवी मुंबई, श्रीमती मनीषा जाधव, महाव्यवस्थापक (प्रशासन आणि विभाग), श्री गिरीश थॉमस मुख्य व्यवस्थापक (वाहतूक जेएनपीए), श्री बाळासाहेब पवार उपसंरक्षक जेएनपीए, मुंबईस्थित जेएनपीएचे वरिष्ठ अधिकारी, प्रशिक्षक आणि विविध एजन्सींचे सहभागी सहभागी झाले होते. भारतीय बंदरांच्या विशिष्ट सुरक्षा आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे, मग ते प्रवेश नियंत्रण असो, मालवाहू सुरक्षा असो किंवा सायबर धोके आणि तस्करी यासारख्या उदयोन्मुख आव्हानांना तोंड देण्यासाठी. पुढील दोन आठवड्यात, पर्यवेक्षक आणि इतर पदांवर असलेल्या ४० सहभागींना ऑपरेशनल प्रक्रिया, वर्तन ओळखण्याचे तंत्र, संकट प्रतिसाद आणि आंतर-समन्वय यावर व्यापक प्रशिक्षण दिले जाईल. यामागील उद्देश केवळ प्रक्रिया सामायिक करणे नाही तर एक समान सुरक्षा संस्कृती निर्माण करणे आहे जिथे उखडऋ आणि खाजगी सुरक्षा कर्मचारी समान वृत्ती, दक्षता आणि व्यावसायिक कार्यक्षमतेने काम करतील.

# पनवेल महापालिकेच्या कर-मित्र चॅटबॉटचे लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी ‘अभय योजना’ राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या मागणीनुसार आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या योजनेत शास्ती माफीसाठी दिलेली मुदत आता वाढविण्यात आली आहे.



आता १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबरपर्यंत शास्तीवर ९० टक्के सुट राहणार आहे. तसेच १६ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत कर भरल्यास ७५ टक्के शास्ती माफी मिळणार आहे. २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षासाठी ३१ ऑगस्ट २०२५पर्यंत संपूर्ण कर भरल्यास ५ टक्के सवलतही दिली जाणार आहे. महापालिकेच्या वतीने करदात्यांना ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यासाठी प्रोत्साहित केले जात असून असे केल्यास अतिरिक्त २ टक्के सवलतीचा लाभ मिळू शकतो. तसेच ऊर्जा बचत, जल पुनर्भरण, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक उपक्रम यामध्ये सहभाग घेणाऱ्या करदात्यांना देखील २ टक्के सवलतीची तरतूद करण्यात आली आहे. पनवेल महानगरपालिकेच्या panvelmc.org या अधिकृत संकेतस्थळावर तसेच PMC Tax App आणि Panvel Connect Appद्वारे ऑनलाइन कर भरता येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊन प्रलंबित कर तत्काळ भरावा, असे आवाहन आयुक्त उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे. नागरिकांचा अभय योजनेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. म्हणूनच नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार आता १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९०टक्के सुट राहणार आहे. अभय योजनेमध्ये १८ऑगस्ट ते १५ऑगस्ट आतापर्यंत एकूण २१२कोटी ५७ लाखाची विक्रमी वसुली झाली आहे.

### *अशी आहेत चॅटबॉटची वैशिष्ट्ये...*

***नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने ‘कर-मित्र’ चॅटबॉटचे नुकतेच लोकार्पण केले आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवेल. कर-मित्र चॅटबॉटद्वारे नागरिकांना विविध सेवा उपलब्ध होतील जसे की, मालमत्ता कराची थकबाकी त्वरित जाणून घेणे. आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून थेट कर भरता येणे. बिल, पावती व कर गणनेबाबत शंका निरसन. योजना, सवलत आणि अंतिम तारखांबाबत अद्ययावत माहिती. अधिक मदतीसाठी नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाइटवरील कर-मित्र चॅटबॉट चा वापर करावा.***

# उरणमध्ये भर पावसात गोविंदा पथकांचा थरार

**उरण : वार्ताहर**

उरण शहरात आमदार महेश बालदी मित्र मंडळ वतीने शनिवार( दि. १६ ) रोजी दहीहंडी उत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले होते . पेन्शनर पार्क ,उरण नगरपरिषद शाळा,डॉ. नानासाहेब धर्माधिकारी शाळा गर्गे परांगणात हा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.उरण तालुक्यातून सुमारे ३६ गोविंदा पथकांनी हजेरी लावली .सर्व गोविंदा पथकांचे आमदार महेश बालदी यांनी स्वागत केले.



ज्या गोविंदापथकांनी ७ थरांची सलामी दिली त्यांना अकरा हजार रुपये व सन्मान चिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. त्याच प्रमाणे सहा थरांची सलामी देणाऱ्या गोविंदा पथकांना पाच हजार व सन्मान चिन्ह आमदार महेश बालदी यांच्या हस्ते देवून सन्मानितकरण्यात आले .करमणूक कार्यक्रम म्हणून डान्स,व जुनी व नवी हिंदी ,मराठी गाण्यांचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

या वेळी माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे,उपनगराध्यक्ष जयविन कोळी, महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य रवी भोईर ,माजी नगरसेवक तथा भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह,माजी नगरसेवक राजेश कोळी, राजेश ठाकूर, रजनी कोळी,जान्व्ही पंडित,नंदू लांबे,, प्रियंका पाटील उरण शहर अध्यक्ष संपूर्णा थळी ,भाजप उरण शहर अध्यक्ष निलेश पाटील, जसिम गॅस, सुप्रिया म्हात्रे,हितेश शाह,संतोष ओटावकर ,मकरंद पोतदार,निलेश कदम,मनन पटेल,मनोहर सहतिया ,देवा घरत,सुरज ठवले ,उद्योजक सुनील पेडणेकर ,रंजना पाटील,उरण शहर युवा आदि मान्यवर उपस्थित होते .

# गव्हाण विद्यालयात आदर्श व्यक्तिमत्वांची मुलाखत मालिका

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये ‘मुलाखत’ या नाविन्यपूर्ण उपक्रमाला या शैक्षणिक वर्षापासून प्रारंभ होत असून विद्यालयाचे प्रेरणास्थान रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रेरणेतून आणि प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर यांच्या संकल्पनेतून या नाविन्यपूर्ण उपक्रम मालिकेच्या पहिल्या भागाचे चित्रीकरण नुकतेच पूर्ण करण्यात आले.

स्वकर्तृत्वावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे माजी विद्यार्थी; त्याचप्रमाणे अपार मेहनतीने आपल्या उद्योग,व्यवसायात यशस्वी झालेले गव्हाण पंचक्रोशीतील सुप्रसिद्ध उद्योजक, व्यावसायिक व अन्य आदर्श व्यक्तिमत्वांची मुलाखत विद्यार्थ्यांमार्फत घेतली जाणार आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश कला केंद्र ह्या कोपर परिसरातील गणेशमूर्ती साकारण्याची पारंपारिक कला जोपासत आलेल्या कारखान्याला आठवी ब मधील मुलाखत चमूने प्रत्यक्ष भेट देवून मालिकेचे पहिले पुष्प गुंफले.

# पनवेलमध्ये मयूखा महोत्सव-भारतीय शास्त्रीय नृत्याचा उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलची सांस्कृतिक भूमी दिनांक २३ ऑगस्ट रोजी भारतीय शास्त्रीय नृत्याच्या रंगांनी उजळून निघणार आहे आणि त्याचे कारण आहे, नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटरच्या वतीने आपल्या समृद्ध नृत्य वारशाच्या जतन व प्रसारासाठी समर्पित एक महोत्सव आणि त्याचे नाव आहे मयूखा. विशेष म्हणजे परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा एवढा मोठा कार्यक्रम रसिकांसाठी विनाशुल्क असणार आहे.

पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालय या ठिकाणी होणारा हा कार्यक्रम २३ ऑगस्टला सायंकाळी ०६ वाजता सुरू होणार आहे. यामध्ये नालंदा बानीतील मोहिनीयट्टम ख्यातनाम वादकांचा थेट वाद्यमेळ पनवेल व परिसरातील कला-रसिकांसाठी एक सांस्कृतिक मेजवानी असणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, विधान परिषद आमदार विक्रांत पाटील, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व मयूखा प्रायोजक परेश ठाकूर, नॅशनल टेलिफोन ॲडव्हायजरी कमिटी सदस्य श्री. रमेश, विशेष पाहुणे म्हणून नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उमा रेले, मोहिनीअट्टम नृत्यांगना व संस्थापिका निदेशिका डॉ. डिंपल नायर




तर सेलिब्रिटी पाहुणे म्हणून मल्याळम अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना देवी चंदना, मराठी अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना तन्वी पळव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पद्मभूषण डॉ. कनक रेले यांच्या शिष्या व नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी नयना प्रकाश यांच्या संकल्पना व दिग्दर्शनाखाली हा उत्सव आयोजित होत आहे. मयूखाचा उद्देश कलाकार, रसिक आणि सांस्कृतिक प्रेमींना एका व्यासपीठावर आणणे हा आहे. या वर्षीच्या उद्घाटन कार्यक्रमात नालंदा बानीतील मोहिनीयट्टमचे मनमोहक सोलो सादरीकरण होणार असून, ते कलाश्री कलामंदलम सी. गोपाळकृष्णन यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यकलामंदिरम् सेंटर फॉर आर्ट्समार्फत सादर केले जाणार आहे. सादरीकरणासोबत थेट वाद्यमेळाचा संगत असेल, ज्यामुळे प्रेक्षकांना एक अद्वितीय सांस्कृतिक अनुभव मिळेल. मयूखा हे असे व्यासपीठ आहे जे केवळ शास्त्रीय नृत्यप्रकारांची गहनता आणि सौंदर्य प्रदर्शित करत नाही, तर पुढील पिढीतील कलाकारांना प्रोत्साहन देते. नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटर या उपक्रमाद्वारे तरुण नर्तकांना प्रेरणा देण्याचे आणि प्रेक्षकांना भारताच्या पारंपरिक कलांचा खरा आस्वाद देण्याचे उद्दिष्ट ठेवते. परफॉर्मिंग आर्ट्समधील पदव्युत्तर शिक्षण आणि मोहिनीयट्टमसाठीच्या अनेक वर्षांच्या समर्पणामुळे, नयना प्रकाश यांनी अनेक प्रतिष्ठित मंचांवर सादरीकरणे केली आहेत. त्यांच्या सादरीकरणात लास्य (कोमलता) आणि रौद्रम (तेज) यांचा सुंदर समन्वय दिसून येतो, ज्यामुळे प्रत्येक नृत्यप्रयोग दृश्य व भावनिक दृष्ट्या अद्वितीय ठरतो. परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा कार्यक्रम रसिकांसाठी एक पर्वणी आहे. त्यामुळे याचा लाभ जास्तीत जास्त रसिकांनी घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले असून या कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी नयना प्रकाश ७७०००५२४२९ यांना संपर्क साधा.

# मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात सलग २१व्या वर्षी ‘सीकेटी’ला विजेतेपद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षक प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स आणि सायन्स कॉलेज (स्वायत्त)ने कर्जत येथे झालेल्या कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या ५७व्या आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव उत्तर रायगड विभागातील सांस्कृतिक स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत २३ पारितोषिके प्राप्त करून आपली यशस्वी वाटचाल कायम राखली आहे.



दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेत उत्तर रायगड विभागातून एकूण ३२ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत नृत्य, अभिनय, साहित्य, फाईन आर्ट व संगीत या कला प्रकारातील एकूण ३० वैयक्तिक आणि सांघिक प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. सीकेटी महाविद्यालयाने सर्व ३० वैयक्तिक आणि सांघिक स्पर्धा प्रकारांमध्ये सहभाग घेतला. त्यामधील ३० स्पर्धा प्रकारांचे निकाल जाहीर करण्यात आले. जाहीर निकालांपैकी ‘सीकेटी’ने २३ पारितोषिके प्राप्त केली. यामध्ये सात प्रथम, १० द्वितीय, चार तृतीय आणि दोन उत्तेजनार्थ क्रमांकाची पारितोषिके महाविद्यालयास प्राप्त करून देत सलग २१ वर्ष रायगड जिल्हा विभागीय चॅम्पियनशिप जिंकण्याचा बहुमान मिळविला आहे.

सर्व पारितोषिक विजेते विद्यार्थी, महाविद्यालयाच्या सांस्कृतिक चमू व सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. गीतीका तन्वर व सांस्कृतिक समन्वय गणेश जगताप यांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अनिल भगत, परेश ठाकूर संस्थेचे सर्व कार्यकारी मंडळाचे सदस्य, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील सर्व प्राध्यापकवर्ग व शिक्षकेतर सेवक यांनी विशेष अभिनंदन केले आणि विद्यापीठस्तरीय फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.

### महाविद्यालयास प्राप्त झालेली पारितोषिके

#### वैयक्तिक पारितोषिके

शिल्पकला स्पर्धा प्रथम क्रमांक मयूर ठोंबरे, कार्टूनिंग स्पर्धा प्रथम भूमी शर्मा, मेहंदी स्पर्धा प्रथम तृप्ती वाघमारे, पाश्चात्य वादन स्पर्धा प्रथम सुजल पाटील, कोलाज स्पर्धा द्वितीय क्रमांक अथर्व पाटील, वक्तृत्व (मराठी) स्पर्धा द्वितीय नुपूर म्हात्रे, वक्तृत्व (इंग्रजी) स्पर्धा द्वितीय साशा वायंगणकर, चित्रकला द्वितीय साईश पाटील, एकपात्री स्पर्धा द्वितीय जितेंद्रे माने, कथाकथन स्पर्धा प्रथम अनुष्का कोकंबे, पाश्यात्य गायन स्पर्धा तृतीय सुशांत खिल्लारे, शास्त्रीय गायन स्पर्धा तृतीय मोनालिसा सामंता, भारतीय शास्त्रीय वादन स्पर्धा उत्तेजनार्थ अखिलेश कुंभार, रांगोळी उत्तेजनार्थ अथर्व पाटील.

#### सामूहिक पारितोषिके

वादविवाद स्पर्धा (मराठी) प्रथम क्रमांक नुपूर म्हात्रे आणि अनुष्का कोकंबे, लघुनाटक स्पर्धा (मराठी) प्रथम आर्यन अन्सारी आणि संघ, भारतीय लोक नृत्य प्रथम भूमी कोळी आणि संघ, एकांकिका (मराठी) द्वितीय क्षितीज गायकवाड आणि संघ, एकांकिका (हिंदी) द्वितीय सुरभी घांगनेकर आणि संघ, भारतीय ग्रुप गायन स्पर्धा द्वितीय सुयश कडव आणि संघ, पाश्चात्य समूह गायन स्पर्धा द्वितीय राधिका फडके आणि संघ, लघुनाटक स्पर्धा (हिंदी) द्वितीय महती गडकरी आणि संघ, मूकनाट्य स्पर्धा तृतीय जीत जाधव आणि संघ.



**पनवेल : बुध्दगया प्रतिष्ठानच्या वतीने ७९वा स्वातंत्र्य दिन मुसळधार पावसातही प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष व माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली बिनेदार कॉर्नर आणि प्रकाश बिनेदार आम्रपाली बुध्द विहार, सेक्टर ९, नवीन पनवेल या ठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला.**



**पनवेल : नायर सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल पनवेल व नवदृष्टी सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिनी समाजातील गरजू व्यक्तीकरिता मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिरात डॉ. संतोषकुमार नायर यांच्या मार्गदर्शनाखाली २५ व्यक्तींच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. आपण समाजाचे काही देणे लागतो या विचाराने अशा शिबिराचे आयोजन दर वर्षी प्रजासत्ताक दिनी व स्वातंत्र्य दिनी केले जाते.**

# कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी रक्तदान शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

युवाप्रेरणा सामाजिक संस्था व माहेश्वरी प्रगती मंडळ खारघर यांच्या संयुक्त विद्यमानाने मागील सोळा (१६) वर्षांपासून देशाच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत सातत्यपूर्ण टाटा कॅन्सर हॉस्पिटल मधील कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते.



यावर्षी देखील दिनांक १५ ऑगस्ट रोजी सदर रक्तदान शिबिर रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, सेक्टर १९, खारघर येथील हॉलमध्ये संपन्न झाले. सदर रक्तदान शिबिरात ९१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिराला भेट देण्यासाठी पनवेलचे आमदार प्रशांत दादा ठाकूर हे उपस्थित होते . त्यांनी युवाप्रेरणा सामाजिक संस्थेच्या वतीने व माहेश्वरी प्रगती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अविरत असं रक्तदानाचं जे कार्य सुरू आहे त्याबद्दल युवाप्रेरणा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण पाटील व भाजपा नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांचे तसेच माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष राम दाड व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले.

रक्तदान शिबिराला भेट देण्यासाठी विधान परिषद सदस्य आमदार विक्रांत दादा पाटील यांनी उपस्थित रहात युवाप्रेरणा सामाजिक संस्थेच्या वतीने जो सातत्यपूर्ण व अविरत असं रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येते त्याबद्दल युवाप्रेरणा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण पाटील व नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांचे कौतुक करीत रक्तदात्यांना सांगितले की आपण रक्तदान करून देखील देश सेवा करू शकतो. आपल्या देशाचे सैनिक हे भारताच्या सीमेवर अहोरात्र लढा देत आहेत ते देशसेवा करतच आहेत परंतु त्याचबरोबर रक्तदानाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिक देखील देशसेवा करू शकतो अशी भावना त्यांनी यावेळी रक्तदात्यांसमोर मांडली.

युवाप्रेरणा सामाजिक संस्थेच्या सचिव नगरसेविका नेत्रा किरण पाटील तसेच उपाध्यक्ष आदित्य हातगे, वैभव शेजवळ,दिनेश यादव, नितीन पाटील, रणजीत पाटील, विनोद कढरे , प्रेरणा मनसरे यांनी व माहेश्वरी प्रगति मंडल अध्यक्ष राम दाड, सचिव अमित भांगडे, सोमन मालानी, डॉ.राकेश सोमानी,सचिन मुंदड़ा, सचिन साबु यांनी रक्तदान शिबिर यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी अथक परिश्रम घेतले. रक्तसंकलनासाठी टाटा कॅन्सर हॉस्पिटल (एकट्रॅक) खारघर येथील ब्लड बँकचे डॉक्टर स्मृति डॉक्टर आदिती तसेच रक्तपेढीचे वैद्यकीय समाजसेवक अभिजीत रावतळे, कल्पेश चव्हाण यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

# सिनेमाच जेव्हा वेळेचा खेळ बदलवतो...

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीतील काही चित्रपट रसिकांनी मला व्हॉटसअ‍ॅपवर एक प्रश्न पाठवला, 'शोले' तब्बल एकवीस रिळांचा, आजच्या भाषेत तीन तास अठरा मिनिटांचा होता, तर मग त्याच्या खेळाच्या वेळा काय होत्या?

प्रश्न खरंच महत्त्वाचा. त्यातही आजच्या मल्टीप्लेक्स युगात सकाळी साडेआठ नऊ ते रात्री साडेअकराचा मिडनाईट मॅटीनी शो असे खेळ असतात नि काही मुव्हीज शंभर मिनिटांच्या असतात. त्यात तर हा प्रश्न खूपच महत्वाचा. पूर्वी चित्रपटाच्या वेळेचे गणित पक्के असे. दक्षिण मुंबईतील चित्रपटगृहात सकाळी साडेअकरा वाजता मॅटीनी शो (जुने चित्रपट प्रदर्शित करण्याच्या या प्रथेत मग नवीन चित्रपट प्रदर्शित होऊ लागले, पण मॅटीनी शोची इमेज व वैशिष्ट्य कायम राहिली) व दिवसा तीन, सहा व नऊ असे तीन खेळ. चित्रपट मोठा असेल तर वेळ मागेपुढे होई. श्याम बेनेगल, बासू भट्टाचार्य वा बासू चटर्जी दिग्दर्शित चित्रपट चौदा रिळांचे असत आणि त्यांचे अनेक चित्रपट मॅटीनीलाच प्रदर्शित होत. दिवसा तीन खेळ असतील तर साडेतीन, साडेसहा व साडेनऊ अशी वेळ असे. दिग्दर्शक मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा यांना आपण पब्लिकला भरपेट, भरगच्च मसालेदार मनोरंजक चित्रपट देण्याची हौस मौज, त्यांचे पिक्चर अठरा रिळांचे असत. सेन्सॉर सर्टिफिकेटवर ते वाचताच पब्लिकमधून हमखास टाळी येई. जणू नेहमीच्याच तिकीटावर जास्त पिक्चर पहायला मिळणार. त्या मनोरंजक चित्रपटाची वेळ दुपारी अडीच, सहा व नऊ अशी साधारण असे. उपनगरातील चित्रपटगृहात कायमच बारा, तीन, सहा, नऊ अशी हुकमी वेळ असे. याच नावाचे मराठीत पुस्तकदेखील प्रकाशित झाले आहे.

'शोले'च्या वेळेस मिनर्व्हात दीड, साडेपाच व रात्री नऊ वाजून वीस मिनिटे अशी होती. सुरुवातीस ती अडनीळी वाटे, मात्र पिक्चर हिट होताच ती माहितीची झाली.

आपली 'सिनेमा प्रेक्षक संस्कृती' खूप जगावेगळी आहे असे मी कायमच अभिमानाने सांगतो. आपल्याला आपल्याकडे अनेक प्रादेशिक भाषेत आणि हिंदीत निर्माण होत असलेल्या चित्रपटाचे विशेष कौतुक हवेच, कारण ते आपल्याकडील बहुसांस्कृतिक, सामाजिक, बदलत्या माध्यम व वातावरणातून वाटचाल करतेय.

आता हेच बघा ना, तुम्ही पूर्वी एकाद्या तालुक्याच्या ठिकाणच्या अथवा अगदी गावातल्या सिनेमा थेटरात रात्रीचा शो पहायला गेला असाल तर तुमची एक आठवण नक्कीच असेल, सिनेमाचा क्लायमॅक्स (अर्थात शेवट) जस जसा शेवट येत असतानाच एक लक्ष असे की, सिनेमा संपल्यावर घरी जायला टमटम (सहा सीटची रिक्षा) मिळेल काय? स्वत:ची सायकल अथवा स्कूटर असेल तर असा प्रश्न पडत नसे, पण तसे नसेल तर? याच गोष्टीला 'दुसरी बाजू'ही आहेच. ती म्हणजे प्रेक्षकांची गैरसोय होऊ नये म्हणून ग्रामीण भागातील थेटरवाले रात्रीचा खेळ बारापूर्वीच संपेल याची काळजी घेत आणि समजा, चित्रपटच त्यापेक्षाही जास्त लांबीचा असेल तर? तर ते बिनदिक्कतपणे 'आपल्या अधिकारात' त्यातील काही चक्क कापत... त्यांची चित्रपट संकलन कला जगावेगळी, पण चित्रपट वेळेवर संपवायला हवी अशी. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीतील हाही एक अजब फंडा.

आमिर खान निर्मित आणि आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान' (२००१)ला आपण अशीच कात्री लावली आणि रात्री बारा वाजता 'शेवटचा खेळ' संपेल हे पाहिले. इतकेच नव्हे; तर या पिक्चरच्या एकूणच लांबीमुळे माझ्या टॉकीजमध्ये दिवसा चार शो बसत नव्हते, पण आम्हीच काही दृश्ये कापल्याने ते शक्य झाले असे चक्क असाच एक ग्रामीण भागातील थेटरवाला त्या काळात नाझ चित्रपटगृहाच्या इमारतीतील एका वितरकाच्या कार्यालयात मला भेटला असता 'जणू काही यात आश्चर्य वाटण्याजोगे' काहीच नाही अशा पध्दतीने माझ्या चेहऱ्यावरील आश्चर्याकडे दुर्लक्ष करीत मला सांगत होता आणि आपल्याकडील 'थियटर संस्कृती'चा आणखी एक झक्कास प्रत्यय आला. गोष्ट छोटी वाटते, पण महत्त्वाची आहे.

असे काही ऐकले की, माझे कुतूहल वाढते आणि मग काही गोष्टी जाणून घ्याव्याश्या वाटतात. मग समजले की ती दीर्घकालीन परंपराच आहे. नेहमीपेक्षा जास्त लांबीचे चित्रपट हे शहरातील थेयटर संस्कृतीत ठीक आहे, पण शहरापासून जेवढे दूर दूर जात राहू तर 'त्याच चित्रपटाची लांबी कमी कमी होत जाते', कारण शोची दिवसा चार खेळ आणि वेळ सांभाळायची असते. भले इकडे मोठ मोठ्या परिसंवादात, इव्हेन्टसमध्ये चित्रपटाच्या आशय, बदलते तंत्रज्ञान, वितरण, मार्केटिंग, पूर्वप्रसिद्धी, बजेट यावर भली मोठी गंभीर चर्चा होत असेल. दूरवरच्या प्रेक्षकांपर्यंत चित्रपट पोहचण्याचे जग वेगळे.

मल्टीप्लेक्स व डिजिटल युगापूर्वीची आपल्या देशातील चित्रपटाच्या खेळाची हुकमी वेळ काय होती हे मी सुरुवातीलाच सांगितले. मी तीनच्या शोला जातोय, मी लास्ट शो पहायला असे बोलण्याची सामाजिक सांस्कृतिक परंपराच होती. एखाद्या थिएटरमध्ये एकच चित्रपट चारही खेळासाठी असेल तर 'दिवसा चार खेळ ' असे एवढेच दिले जाई आणि समजा, हीच वेळेची चौकट जेव्हा मोडली जाई?

राज कपूर अभिनित, निर्मित व दिग्दर्शित 'संगम' (१९६४)ची लांबी फारच आहे आणि म्हणूनच त्याला दोन मध्यंतर आहेत असे 'संगम'च्या पूर्वप्रसिध्दीतच स्पष्ट दिसू लागताच त्याच्या शोच्या वेळा कशा बरे असतील, याबाबत कुतूहल निर्माण झाले होते आणि मग त्याच्या रिलीजच्या वेळी समजले की, दक्षिण मुंबईतील अप्सरा थिएटरचे उदघाटन 'संगम'ने होत असून शोच्या वेळा आहेत, दहा, दुपारी साडेतीन आणि रात्री आठ वाजता. सिनेमा चार तासांचा असल्याने या वेळा अगदी स्वाभाविक होत्याच. भायखळ्याच्या जयहिंद टॉकीजमध्ये दिवसा चार खेळ अशी प्रथा असल्याने तेथे 'संगम'साठी वेळा होत्या, सकाळी पावणेआठ, दुपारी बारा वाजता, मग सव्वाचार वाजता व रात्री नऊ वाजता. एकदा हे वेळेचे गणित समजले, पिक्चर पब्लिकला आवडला आणि मग 'संगम' पहायला जाण्याची वेळ पब्लिकच्या माईंडमध्ये सेट झाली. यश बरेच काही घडवते ते हे असेही आणि यशाच्या गोष्टीत फार रंजकताही असते.

अशा मोठ्या लांबीच्या चित्रपटाबाबत असे नेहमीच घडते. सहज उदाहरण म्हणून ही बघा, 'सूरज', मेन थिएटर नॉव्हेल्टीत दुपारी दोन, संध्याकाळी साडेपाच आणि रात्री साडेनऊ, बी.आर. चोप्रा दिग्दर्शित 'दास्तान', नॉव्हेल्टीत पावणेदोन, साडेपाच आणि नऊ, तर रेक्स आणि लोटसमध्ये सकाळी साडेदहा, दुपारी दोन वाजता, संध्याकाळी साडेपाच आणि रात्री नऊ वाजता. असे दिवसा चार खेळ. राज कपूर दिग्दर्शित 'बॉबी'. मेट्रोत दुपारी सव्वादोन, सायंकाळी पावणेसहा आणि रात्री सव्वानऊ. प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'मुक्कदर का सिकंदर' अलंकारला दोन, पावणेसहा आणि सव्वानऊ. रिचर्ड अटनबरो दिग्दर्शित 'गांधी' रिगलमध्ये इंग्रजीत बारा, सव्वाचार आणि साडेआठ वाजता. तीनच खेळ, तर हिंदीत प्लाझा थिएटरमध्ये सकाळी दहा, दुपारी पावणेदोन, संध्याकाळी साडेपाच आणि रात्री सव्वानऊ.

यावरून तुमच्या एक गोष्ट लक्षात आली असेलच की, वीसपेक्षा जास्त रिळाच्या चित्रपटाच्या खेळाच्या वेळा या अशा नेहमीची चौकट मोडणाऱ्या असत. राज कपूर दिग्दर्शित 'मेरा नाम जोकर', रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शान', सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित 'हम आपके है कौन', आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान', करण जोहर दिग्दर्शित 'कभी खुशी कभी गम' या चित्रपटाच्या वेळीही शोची वेळेची खेळी अशीच होती. 'मेरा नाम जोकर' तर दोन मध्यंतरसह पडद्यावर आला (१८ डिसेंबर १९७०) आणि त्याच्या वेळा त्यानुसार होत्या, पण फर्स्ट डे फर्स्ट शोपासूनच 'जोकर पडला पडला' अशी हाकाटी दिल्याने तो बराचसा कापून एका मध्यंतरचा करण्यात आला आणि मॅटीनी शो, रिपीट रनला कायमच गर्दीत चालला.










तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, पण त्या काळात अशा पद्धतीने 'सिनेमाच्या शोची वेळ' नेहमीपेक्षा वेगळी असेल तर आपल्याला जास्त मोठा चित्रपट पहायचा अशी एक प्रकारची मानसिकता तयार होई आणि अशी काय बरे थीम असेल, असे आपल्याला काय काय बरे पहायला मिळतेय याबाबत उत्सुकता वाढे. एक प्रकारे ते गरजेही असते. ते दिवसच वेगळे होते. शोची वेळ हा अनेक लहान मोठ्या गोष्टींना जन्म देणारी असे. त्यात पुन्हा दुपारचा खेळ दोन वाजता असेल तर आपोआपच मॅटीनी शोची वेळ अकराची करावी लागे. या सगळ्यात काय व्हायचे माहित्येय? मॅटीनी शो साडेअकराचा, पहिला खेळ तीनचा, दुसरा सहाचा आणि रात्रीचा साडेनऊचा असे सरावाचे टाईम टेबल पक्के असणारे रसिक प्रेक्षकांची अनेकदा तरी चित्रपटाची सुरुवातच चुकत असे अथवा त्यांना हा चित्रपट नंतर बघू असा तत्काळ निर्णय घेत अन्य थिएटरवर जावे लागत असे. चित्रपती व्ही. शांताराम दिग्दर्शित 'चानी'च्या जाहिरातीत अगदी ठळकपणे दिले होते, 'वेळेपूर्वी या, अगोदर आलेल्यांना डिस्टर्ब करू नका'. इरॉसमध्ये या चित्रपटासाठी शोची वेळ होती, साडेबारा, साडेतीन, साडेसहा आणि साडेनऊ.

अशा या चित्रपटाच्या खेळाची वेळ या संस्कृतीत 'मेरी आवाज सुनो'च्या वेळी नियमित शोमध्ये भर पडली. एका दक्षिण भारतीय प्रादेशिक भाषेतील चित्रपटाची रिमेक असलेल्या या चित्रपटात प्रचंड हिंसा असल्याच्या कारणास्तव त्यावर बंदी येणार अशा बातमीने वादळ निर्माण केले आणि याचाच व्यावसायिक फायदा उठविण्यासाठी या चित्रपटाचे शो वाढवताना सकाळी नऊचा 'जादा खेळ' लावला गेला. मी स्वत: मिनर्व्हात असा सकाळी नऊ वाजताच्या शोला गेलो. बंदी आलीच तर पहायचा राहून जाईल याची भीती वाटत होती हो आणि मग मी हा चित्रपट पहायला असा भाव खात गिरगावात फिरलो.

मध्य आणि उत्तर भारतातील अनेक छोट्या शहरात अनेक मोठ्या चित्रपटांचे राऊंड शो होत. ते रुजलेच होते. विशेषत: फर्स्ट डे फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्ट भारी आला रे आला थिएटरवर गर्दी उसळे आणि कुठे जमलचं तर रात्री बाराचाही अथवा सकाळी सहा वाजल्यापासून शो सुरु. कधी एकदा हा सुपर हिट पिक्चर पाहतोय अशी जबरा वातावरण निर्मिती व्हायची. आपल्या देशात चित्रपट फक्त पडद्यावर राहत नाहीत याचाच हा सज्जड पुरावाच जणू. विजय कोंडके निर्मित व दिग्दर्शित 'माहेरची साडी'च्या बाबतीतही पश्चिम महाराष्ट्रातील काही ठिकाणी हेच घडले. एक शो संपतोय तोच पुढचा असा फंडा आणि अशा क्रेझच्या चौकटीतील बातम्या सिनेमाला आणखी चर्चेत ठेवत व ते योग्यच असते. पिक्चर रिलीज झाल्यावर त्याची जास्त जोरशोरसे प्रसिद्धी व्हायला हवी हे सर्वकालीन सत्य आजची चित्रपटसृष्टी जवळपास विसरलीय. चित्रपट प्रदर्शित झाला एवढेच पुरेसे नसते, हे जुन्या काळातील फिल्मवाल्यांना चांगलेच समजलेले.

मल्टीप्लेक्स युगात सकाळपासूनच शो सुरु होतात आणि रात्री उशीरापर्यंत असतात, पण त्यातले फर्स्ट शो फर्स्ट शोचे वातावरण, त्यातले थ्रील आणि शोच्या वेळेतील धक्के हे सगळेच हरवलेय. कोणत्याही वेळेचा शो पाहिला तरी काय फरक पडतोय अशा गोष्टीपर्यंत येऊन पोहचलोय. मल्टीप्लेक्सबाहेर कायमच शुकशुकाट दिसतो. थिएटरभोवतीची गर्दी ही गोष्ट सोशल मीडियात तेव्हाचे फोटो पाहताना दिसतेय.

सिनेमाची वेळ काय होती आणि आता काय वेळ आली असे तर नव्हे ना? फिल्मवाल्यांच्या भाषेत सांगायचे तर पिक्चर हिट असेल तर बोलणार 'टाईम अच्छा चल रहा है' आणि पिक्चरला पब्लिकने नाकारले तर त्यांचे ठरलेले असते, बुरा टाईम चल रहा है... असे काहीही असले तरी कोणावर कशी वेळ आणायची हे पब्लिकच्या हातात असते.

शोले पब्लिकने असा व इतका डोक्यात व डोक्यावर घेतला की त्याची कायमच चलतीची वेळ राहिली. मनोरंजक उपग्रह वाहिनी, यू ट्यूब व ओटीटी यावर कोणत्याही वेळी चित्रपट रसिक शोले पुन्हा पुन्हा पाहण्यास उत्सुक आहेत हे यश तर कशातही मोजता न येणारे...

---

# ग्रंथालयीन सेवासुविधांच्या उन्नतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

जीवनाच्या विकासाचा मुख्य आधार शिक्षण आहे आणि त्या शिक्षणाचा मुख्य पाया ग्रंथालये आहेत. विकसित ग्रंथालये शिक्षणाला बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. जगभरात ग्रंथालये चांगली विकसित झाली आहेत. आता ई-पुस्तके आणि सर्व प्रकारचे ई-साहित्य इंटरनेटद्वारे सर्वत्र सहज उपलब्ध आहे. डिजिटल आणि व्हर्च्युअल ग्रंथालयांची मागणी सतत वाढत आहे.

आपल्या देशातील अनेक उच्च शिक्षण संस्था, खासगी शैक्षणिक संस्थांचीदेखील ग्रंथालये चांगल्या प्रकारे विकसित होऊन वाचकांना सर्वोत्तम सेवा देत आहेत. शासनसुद्धा शिक्षण आणि ग्रंथालयांच्या विकासात मदत करत आहे, तरीही लोकसंख्या आणि गरजेनुसार प्रगत ग्रंथालयांच्या बाबतीत आपण खूप मागे आहोत. आजच्या आधुनिक युगात, वाचकांना कमी वेळेत चांगल्या सेवा-सुविधांचा लाभ घेता यावा म्हणून ग्रंथालयांमध्ये तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत संसाधनांचा वापर केला जात आहे. एआय क्रांती नुकतीच सुरू झाली आहे, ज्याचा परिणाम ग्रंथालयांवरही झाला आहे. म्हणजेच ग्रंथालय उन्नतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जात आहे.

देशातील ग्रंथालय शास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाणारे पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांची जयंती १२ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून यंदाही उत्साहात साजरी झाली. ग्रंथालयांचा चांगला विकास, उत्तम सेवा-सुविधा आणि प्रत्येक वाचकाला पुस्तक आणि प्रत्येक पुस्तकापर्यंत सहज उपलब्धता हे ग्रंथालयाचे निष्पक्ष धोरण आहे. पद्मश्री डॉ. रंगनाथन यांनी दिलेले ग्रंथालय शास्त्राचे पाच नियम कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे अधिक चांगल्या प्रकारे पाळले जाऊ शकतात. पुस्तके वापरण्यासाठी आहेत, प्रत्येक वाचकाला त्याचे पुस्तक मिळाले पाहिजे, प्रत्येक पुस्तकाला वाचक मिळाला पाहिजे, वाचकांचा वेळ वाचला पाहिजे आणि ग्रंथालय ही एक विकसित होणारी संस्था आहे. हे नियम ग्रंथालयांच्या सुलभतेचे महत्त्व, वापरकर्त्यांच्या आवश्यकता आणि त्यांच्या विकसनशील स्वरूपावर भर देतात. कृत्रिम बुद्धिमत्ता हे पाच ही नियम उत्कृष्टरित्या पाळणार.



आजच्या माहिती युगात, प्रत्येक क्षणी डेटाचा ज्ञानरुपी स्फोट होत आहे, ते ज्ञान पात्र वाचकापर्यंत कमी वेळात पोहोचवणे खूप महत्वाचे आहे. त्यामुळे आता तांत्रिक संसाधनांवर अवलंबून राहणे वाढले आहे. एआयचा वापर आता अनेक क्षेत्रांमध्ये खूप प्रभावीपणे केला जात आहे, आर्टिफिशियल इंटेलिजेंस माहिती क्षेत्रात बदल घडवून आणत आहे आणि ग्रंथपालांच्या पारंपारिक कार्याला एक नवीन रूप देत आहे. शैक्षणिक आणि संशोधन ग्रंथालये त्यांच्या सेवा आणि स्पर्धात्मक फायदा सुधारण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजेंस हे याचे मुख्य साधन आहे. वाचकांना प्रगत सेवा पुरविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा सक्रिय नेता म्हणून स्वीकार करावा लागेल. हे प्रगत तंत्रज्ञान नक्कीच ग्रंथपालांसाठी नवीन मार्ग उघडेल आणि हे नवीन नाविन्यपूर्ण पदे आणि भूमिका हाताळण्यास, सध्याच्या आव्हानांचे निराकरण करण्यास आणि त्यांना अप्रचलित होण्यापासून वाचवण्यास मदत करेल.

कृत्रिम बुद्धिमत्ता साधने वाचकांना संबंधित पुस्तके, लेख आणि इतर साहित्य सामग्री जलद शोधणे सोपे करतात. मशीन लर्निंगसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षमता शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये वैयक्तिकृत शिक्षण अनुभवांचे दरवाजे उघडतात. वापरकर्त्यांच्या वर्तनाचे आणि पसंतींचे विश्लेषण करून, ग्रंथालये वैयक्तिक गरजांनुसार सूचना आणि संसाधने तयार करू शकतात. साहित्याच्या वापराच्या पद्धतींचे विश्लेषण करून आणि विशिष्ट संसाधनांच्या भविष्यातील मागणीचा अंदाज घेऊन एआय संग्रह विकासास अनुकूलित करण्यास मदत करू शकते.

इंडेक्सिंग ऑटोमेशन वाचकांना नवीन सामग्री शोधण्यास, विशिष्ट आणि अचूक साहित्य सामग्री प्रदान करण्यास आणि वेगवेगळ्या विषयांमध्ये नेव्हिगेट करण्यास मदत करेल, जे मॅन्युअल इंडेक्सिंगसह सहज शक्य नाही, यामुळे वाचक आणि कर्मचाऱ्यांचा वेळ वाचेल. एकाच विषयावरील कागदपत्रे जुळवणे किंवा समान विषय, उपाय किंवा घटनेचे वर्णन करणारे विभाग जोडणे सहज शक्य आहे. आपण विषयाशी संदर्भानुसार संबंधित हजारो कागदपत्रांच्या सामग्रीची तुलना करू शकतो. एआय जगभरात इंटरनेट वर उपलब्ध असलेल्या साहित्यातून विषयानुसार कागदपत्रे शोधते, त्यांचा अभ्यास करते आणि वाचकांना जलद डेटा प्रदान करते. संशोधन पत्रांच्या वास्तविक मजकुरावर आधारित एआय अल्गोरिदम वास्तविक संशोधनाच्या चांगल्या मॅपिंग सिस्टम तयार करतील, जे संशोधकांसाठी उपयुक्त ठरतील. एआयच्या मदतीने कोणत्याही पुस्तकाचा किंवा लेखाचा सारांश देणे ही एक अतिशय सोपी प्रक्रिया आहे, हे मोठमोठा डेटादेखील लहान परिच्छेदांमध्ये उपलब्ध करून देते.

एखादे नवीन पुस्तक, जर्नल किंवा इतर साहित्य प्रकाशित झाल्यावर एआय टूल्स वाचकांना सतर्क करू शकतात, तसेच विशिष्ट ग्रंथालय संसाधनांकडे निर्देशित करू शकतात. पुनरावृत्ती होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा त्रास संपेल, कारण पुनरावृत्ती थांबेल आणि वेळ वाचेल. ग्रंथालयाच्या कामाची गुणवत्ता वाढेल. संशोधनाचे प्रमाणीकरण किंवा पुनर्वापरक्षमता त्याच्या वाचकांच्या संख्येपेक्षा जास्त महत्त्वाचे आहे, कारण केवळ ठोस आणि वैध संशोधनच विस्तृत वाचकवर्गाला पात्र आहे. ग्रंथालय प्रक्रिया आणि डिजिटल संसाधनांमध्ये मशीन लर्निंग लागू केल्याने संग्रह विश्लेषण, व्हिज्युअलायझेशन आणि जतन ऑप्टिमाइझ करता येते आणि सेवांच्या तरतुदीशी संबंधित खर्च कमी करता येतो. कृत्रिम बुद्धिमत्ता साधने प्रगत शोध क्षमता प्रदान करून, संबंधित संसाधनांची शिफारस करून आणि डेटा विश्लेषणात मदत करून विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना मदत करतात. ग्रंथालयांमध्ये व्हर्च्युअल असिस्टंट आणि चॅटबॉट्सचा वापर खूप सामान्य झाला आहे, वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देऊन मार्गदर्शन होते, यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांचे काम सोपे झाले.

एआय ग्रंथालय सेवा वाढवू शकते आणि दक्षता सुधारू शकते, परंतु ते अल्गोरिदमिक पूर्वाग्रह, डेटा सुरक्षा, कॉपीराइट संबंधी काळजी आणि मानवी संपर्काचे संभाव्य विस्थापन याबद्दल देखील चिंता निर्माण करते. एआयकडून कोणीही तथ्ये मिळवू शकते, परंतु त्या तथ्यांचा अर्थ काय आहे, ते कसे जोडतात आणि ते विश्वसनीय आहेत की नाही हे समजून घेणे, यावेळी मानवी कौशल्ये अमूल्य ठरतात. एआय-चालित ऑटोमेशन ग्रंथालय कर्मचारी आणि वाचकांमधील मानवी संपर्क कमी करू शकते, ज्यामुळे ग्रंथालये वापरत असलेल्या वैयक्तिकृत समर्थन आणि मार्गदर्शनावर परिणाम होऊ शकतो. एआयचा वापर चुकीची माहिती निर्माण करण्यासाठी आणि खोटेपणा पसरवण्यासाठी देखील केल्या जाण्याची शक्यता आहे, ज्यामुळे माहितीचा विश्वासार्ह स्रोत म्हणून ग्रंथालयाची भूमिका आव्हानात्मक ठरते. जगात मोबाईल आणि संगणक क्रांती मानवांच्या विकासासाठी झाली, परंतु या तंत्रज्ञानाचे तोटे देखील दिसून येतात. आज सायबर गुन्हे, सोशल मीडिया व्यसन, ऑनलाइन बनावट ओळख, पैसे लावून ऑनलाइन गेम, फसवेगिरी, अस्वस्थ प्रक्षोभक जाहिराती, ई-कचरा, रेडिएशनमुळे दरवर्षी अब्जावधी डॉलर्सचे नुकसान होते, जीवाचे आणि मालमत्तेचे, मौल्यवान आरोग्याचे आणि पर्यावरणाचे प्रचंड नुकसान होते. त्याचप्रमाणे, भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे होणारा गैरवापर किंवा संकटे नाकारता येत नाहीत.

इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीमधून एआय फिल्टर करते आणि गरजेनुसार माहिती सादर करते. ग्रंथालयांनी सर्व वाचकांसाठी एआय-संचालित सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, ग्रंथालयांनी ग्रंथालयाच्या मूल्यांनुसार उपाय विकसित आणि अंमलात आणण्यासाठी ग्रंथपाल, तंत्रज्ञ आणि इतर भागधारकांमध्ये सहकार्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारताना, ग्रंथालयांनी त्यांच्या सेवांचा मानवी पैलू राखण्याचा आणि वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जरी एआय ग्रंथालयांना अनेक फायदे देत असले तरी, ते सुरक्षित आहे याची खात्री करण्यासाठी संभाव्य धोके आणि आव्हाने हाताळणे महत्वाचे आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा मानवी विकासावर खूप जलद गतीने परिणाम होईल असे गृहीत धरून आपण त्याचा सुज्ञपणे वापर करू. ग्रंथालयाला प्रगत बनवण्यात एआयचे योगदान अमूल्य ठरू शकते, आपल्याला फक्त त्याच्या वापरात कुशल, सावध आणि जागरूक राहण्याची आवश्यकता आहे.

–डॉ. प्रीतम गेडाम

# पर्यावरणपूरक तिरंगा फलक झळकला

**नवी मुंबई : बातमीदार**

नागरिकांनी दैनंदिन वापरातून निसर्गाला हानीकारक असणा–या प्लास्टिकला हद्दपार करावे व प्लास्टिकमुक्त नवी मुंबई ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी स्वयंस्फुर्तीने योगदान द्यावे याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने 'प्रोजेक्ट मुंबई' या स्वयंसेवी संस्थेशी सामंजस्य करार केलेला असून 'नवी मुंबई प्लास्टिक आणि ई–वेस्ट रिसायक्लोथॉन' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या व्यापक स्वरूपातील उपक्रमामध्ये पुनर्वापर केलेल्या प्लास्टिकमधून विविध उपयोगी वस्तू बनविण्यात येऊन थ्री–आर सूत्रांनुसार प्लास्टिकचा पुनर्वापर केला जात आहे.

अशाच प्रकारे 'घरोघरी तिरंगा – घरोघरी स्वच्छता' अभियानांतर्गत प्लास्टिक बाटल्यांच्या झाकणांवर पुनर्प्रक्रिया करून त्या पुनर्वापरित झाकणांपासून तयार केलेल्या तिरंगा फलकाचे स्वातंत्र्यदिनानिमित्त अनावरण महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त भागवत



डोईफोडे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व श्रीम.स्मिता काळे, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे आणि इतर विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

२४६० पुनर्वापरित प्लास्टिकच्या झाकणांपासून तयार केलेली ही तिरंगा फलक प्रतिकृती महापालिका मुख्यालयाच्या आवारातच प्रदर्शित करण्यात येणार असून याव्दारे प्लास्टिकमुक्तीचा संदेश महापालिका मुख्यालयात विविध कारणांसाठी भेट देणा–या नागरिकांच्या नजरेसमोर कायम ठेवला जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत विविध विभागांतील गृहनिर्माण संस्था, वसाहती, कॉर्पोरेट गट, शैक्षणिक संस्था अशा ठिकाणी वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करुन प्रोजेक्ट मुंबई संस्थेच्या वतीने मोठया प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नोंदणीकृत संस्था व सोसायट्यांकडून प्लास्टिक आणि ई–कचरा संकलीत करण्यास सुरूवात झालेली आहे. हा तिरंगा फलकही याच संकलित प्लास्टिक झाकणांपासून तयार करण्यात आलेला आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात साधारणत: २५० हून अधिक सोसायट्यांची नोंदणी करण्यात येत असून या माध्यमातून साधारणत: २ लाख नागरिकांना या उपक्रमात सहभागी करुन घेण्यात येत आहे.

नवी मुंबईकर नागरिकांना प्लास्टिक कचरा कमी करण्याची आणि त्याचा पुनर्वापर करण्याची सवय लागावी व यामधून नवी मुंबई शहर हे स्वच्छ सुंदर शहराप्रमाणेच 'प्लास्टिकमुक्त शहर' म्हणून ओळखले जावे ही नवी मुंबई महानगरपालिकेची भूमिका असून त्याकरिता नवी मुंबईकर नागरिक स्वयंस्फुर्तीने आपले सक्रिय योगदान देतील असा विश्वास महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

# कळंबोली येथील कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**पनवेल : वार्ताहर**

देशप्रेम, देशाभिमान, देशकर्तव्य आणि देशत्याग अशा असंख्य संमिश्र भावना मनात ठेवून भावना मनात ठेवून कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूल कळंबोली येथे देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या जल्लोषात साजरा झाला.

प्रमुख पाहुण्या म्हणून प्रिन्सि. थॉमस उपस्थित होत्या.प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यावर शाळेच्या बँड पथकाने ध्वजाला सलामी देण्यात आली. मनोरंजनात्मक कार्यक्रमांनी या स्वातंत्र्य महोत्सवास अजूनच झळाळी आणली. शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या कलांमधून उपस्थितांची मने जिंकली. एका माहितीपटातून विद्यार्थ्यांनी भारतीय ध्वजाचा इतिहास प्रभावीपणे सादर केला. १९०६ ते १९४७ पर्यंतचा भारतीय तिरंग्याचा प्रवास विद्यार्थ्यांनी सुंदरपणे मांडला. एका नाट्यीकरणातून विद्यार्थ्यांनी सत्य, अहिंसा, अस्तेय यातून घडलेला भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

स्वातंत्र्यलढ्यात शांततेच्या मार्गाने जाणारे स्वातंत्र्यवीर आणि इंग्रजांविरुद्ध गोली का जवाब गोली, अशी भूमिका घेणारे स्वातंत्र्यवीर.नेताजी सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी यांचे कार्य विद्यार्थ्यांनी सादर करून जणू स्वातंत्र्यलढाच सर्वांसमोर उभा केला.



# अमली पदार्थविरोधी जनजागृती




**पनवेल : वार्ताहर**

अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिमेअंतर्गत दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीमध्ये विविध प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात वपोनि स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमादरम्यान अधिकाऱ्यांनी अमली पदार्थाचे दुष्परिणाम याबाबत जनतेला माहिती देऊन जनजागृती केली.

या अंतर्गत येथील सी के टी कॉलेज खांदा कॉलनी ते खांदेश्वर पोलीस ठाणे येथे मानवी साखळी व पायी रॅली यात ११० विद्यार्थी शिक्षक व पो. अधिकारी व अंमलदार यांचा सहभाग होता . त्यानंतर खांदेश्वर पोलीस ठाणे येथील सायकल रॅली यात रोटरी क्लब सहभाग होता. त्यानंतर रायन स्कूल सेक्टर ११ येथे जनजागृती अभियान राबविण्यात आले तसेच एनएमएमटी बस डेपो आसुडगाव येथे जनजागृती अभियान त्याच प्रमाणे सेंट जोसेफ स्कूल, सेक्टर–७, नवीन पनवेल येथे जनजागृती अभियान तर पनवेल रेल्वे स्टेशन येथे जनजागृती अभियान तसेच आदई ग्रामपंचायत येथे ,बालाजी स्प्लेंडर फेज २, आदई येथे अष्टविनायक गृह संकुल फेज २ सोसा. आदई येथे सन बेन सोसायटी आसुडगाव ,पुष्प विनायक कॉम्प्लेक्स आदई गाव येथे सुद्धा अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिम राबविण्यात आली. याला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी यावेळी दिली.

# तीन लाखांच्या वीज चोरीप्रकरणी नेरूळमध्ये गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरुळ सेक्टर १०, मधील एलआयजी च्या घरात, एका इसमाने ८८३४ युनिटची वीज चोरी म्हणजे, तब्बल ३ लाख रुपयांच्या विजेची चोरी केल्याप्रकरणी, नेरूळ पोलीस ठाण्यात चंद्रकांत भिंगारदिवे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आजकालच्या महागाईच्या काळात माणूस काटकसर करत जगत आहे. यासाठी काही लोक वेगवेगळ्या युक्त्या वापरून आपल्या पैशाची बचत करत आहेत. मात्र पैशाची बचत करत



असताना आपण गैर मार्गाने ते बचत करत नाही ना, याचा विचार करणे देखील तितकाच महत्त्वाच आहे. नेरूळमध्ये अशाच एका गैरमार्गाने बचत करणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

नेरूळ सेक्टर १० मधील एलआयजी मध्ये राहणारे चंद्रकांत भिंगारदिवे यांनी, त्यांच्या विजेच्या मीटरमध्ये फेरफार करून तब्बल ८ हजार ८३४ युनिटची म्हणजेच, २ लाख ९० हजार ६६० रुपयांच्या वीज चोरी केल्याचा प्रकार विद्युत विभागाच्या लक्षात आला. सदरचा प्रकार विद्युत विभागाच्या लक्षात आल्यावर अभियंता हेमंत चोरे यांनी, चंद्रकांत भिंगारदिवे याच्या विरोधात तक्रार दाखल केली. , नेरूळ पोलिसांनी भिंगारदिवे याच्या विरोधात भारतीय विद्युत कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# पनवेल मनपा मुख्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या ७९व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेल महापालिकेच्या वतीने छत्रपती संभाजीराजे मैदानावर आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमास आमदार विक्रांत पाटील, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, मंगला माळवे, स्वरूप खारगे, सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.भगवान गीते, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, माजी नगरसेवक, विविध पक्षाचे पदाधिकारी, महापालिकेचे अधिकारी आणि सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या वेळी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल आणि महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन करत ध्वजाला मानवंदना दिली. या वेळी वाहन विभागाच्या ड्रायव्हर केबीनचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याचबरोबर पनवेल महानगरपालिकेच्या १० शाळांमध्येही ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी महापालिकेचे शिक्षक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंगदान जीवन संजीवनी अभियानांतर्गत अवयव दानासाठी नोंदणी केलेल्या दात्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



**पनवेल : आमदार विक्रांत बाळासाहेब पाटील जनसेवा कार्यालय येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त दीपक फर्टिलायझरचे एचआरहेड जयश्री काटकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी त्यांच्या नॅशनल सायकलिंग कोच अमृतसिंग, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, पत्रकार विजय कडू, संजय कदम, चंद्रकांत शिर्के, उद्योजक मयुरेश खिस्मतराव आदी उपस्थित होते.**

# फुंडे विद्यालयात विविध उपक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बी.बी.साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

हर घर तिरंगा अभियान अंतर्गत रांगोळी स्पर्धा, राखी निर्माण स्पर्धा, स्वच्छता मोहीम, तिरंगा सह सेल्फी, तिरंगा यात्रा अशा विविध उपक्रमांचा सहभाग होता. या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

१३ ऑगस्ट रोजी विद्यार्थिनी श्रावणी जयदास कोळी हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. १४ ऑगस्ट रोजी 'रयत'चे माजी विभागीय अधिकारी आर.पी.ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. विद्यालयाचे लेखनिक नवनीत ठाकूर यांच्या प्रयत्नाने आर.पी. ठाकूर यांनी विद्यालयास साउंड सिस्टीम भेट दिली. उपशिक्षक नाईक एस.डी. यांनी पसायदानाचे सामुहिक गायन केले. १५ ऑगस्ट रोजी विद्यालयाचे प्राचार्य बी.बी. साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यालयचे चेअरमन कृष्णाजी कडू ,स्कूलकमिटी सदस्य राजेंद्र ठाकूर प्राचार्य, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका व सेवक वृंद तसेच पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



# पनवेल शहर पोलीस ठाण्यात राबवण्यात आले नशामुक्ती अभियान



**पनवेल : वार्ताहर**

नशा मुक्ती अभियान अंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाकरिता पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली २ पोलीस निरीक्षक, ६ अधिकारी व १४ पोलीस अमलदार यांनी सहभाग घेतला होता. सदर वेळी पोलीस अधिकारी यांनी अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम याबाबत उपसताना मार्गदर्शन करून जनजागृती केली आहे.

यावेळी पनवेल शहर पोलीस ठाणे ते साईनगर परिसरमध्ये पनवेल बोहरी मस्जिद यांचे बँड पथकाकडून रूट मार्च, पनवेल शहर पोलीस ठाणे ते पनवेल शहर परिसरात सायकल रॅली, वडाळे तलाव परिसरात व्ही के हायस्कूल पनवेल एनसीसी विद्यार्थ्यांकडून मानवी साखळी, याकूब बेग हायस्कूल येथे अमली पदार्थ सेवन दुष्परिणाम या विषयावर व्याख्यान तसेच एक धाव नशा मुक्तीसाठी कार्यक्रम, पाडा मोहल्ला मस्जिद येथे अमली पदार्थ दुष्परिणाम या विषयावर मौलवी व पदाधिकारी यांना मार्गदर्शन, तहसील कार्यालय येथे अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन, बार्न्स कॉलेज येथे अमली पदार्थ सेवन दुष्परिणाम मार्गदर्शन पर चर्चासत्र तसेच ओरियन मॉल येथे अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम याबाबत जनजागृती आदी कार्यक्रम राबवण्यात आले.

# अंजुमन–ए–इस्लामच्या काळसेकर टेक्निकल कॅम्पसला शैक्षणिक स्वायत्तता प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन–ए–इस्लामच्या **नॅक** मान्यताप्राप्त काळसेकर टेक्निकल कॅम्पस ला विश्वविद्यालाय अनुदान आयोग (UGC), नवी दिल्ली, कडून अधिकृतपणे शैक्षणिक स्वायत्त दर्जा (Autonomy) प्रदान करण्यात आला आहे, जो शैक्षणिक नवोपक्रम आणि जागतिक स्पर्धात्मकतेच्या प्रयत्नात एक ऐतिहासिक टप्पा आहे. AIKTC मुंबई विद्यापीठाशी संलग्नित अभियांत्रिकी, औषध निर्माण आणि वास्तुकला शास्त्र प्रदान करणारी नवी मुंबई परिसरातील एक नामांकित संस्था आहे. ही स्वायत्तता काळसेकर टेकनिकल कॅम्पस मधील अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र ह्या दोन विभागांना प्रदान करण्यात आली आहे.

ऊद्योगसंरेखित अभ्यासक्रम तयार करण्यासाठी तसेच अत्याधुनिक शिक्षण पद्धतींचा अवलंब करण्यास आणि गतिमान मूल्यांकन प्रणाली लागू करण्यासाठी स्वायत्तता उपयुक्त ठरणार आहे. हे उल्लेखनीय यश मिळवण्यात अंजुमन–ए–इस्लामचे अध्यक्ष डॉ. झहीर आय. काझी (पद्मश्री २०२४); अंजुमनच्या नवी मुंबई बोर्डाचे कार्यकारी अध्यक्ष बुरहान हरिस; कॅम्पस डायरेक्टर डॉ. रमजान खटिक; अभियांत्रिकी विभागाचे डीन डॉ. राजेंद्र मगर; फार्मसी विभागाचे डीन डॉ. शारिक सय्यद तसेच सर्व विभाग प्रमुख ह्यांचा मोलाचा वाटा आहे . अशा दमदार नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी केलेल्या परिश्रमामुळे संस्थेने हे तारांकित यश मिळवले आहे.

स्वायत्ततेमुळे विद्यार्थी,प्राध्यापक तसेच समाजाला ह्याचा मोठा फायदा होणार आहे.


## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव ओमकार ब्रम्हा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. आदई गाव, ता. पनवेल, जि. रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. १८/०८/२०२५ ते २२/०८/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. २५/०८/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि.२७/०८/२०२५ ते १०/०९/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २१/०९/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
(सुरेखा पाटील)
निवडणूक निर्णय अधिकारी

# कुलाबा जिल्ह्यातील संघाचा इतिहास

मी सध्या वनवासी कल्याण आश्रम या संघ परिवारातील संस्थेचा कार्यकर्ता आहे. हे काम माझ्याकडे २००२पासून आहे, तथापि, मी हे काम सुरू केले तेव्हापासूनच माझेकडे सुरुवातीला महाराष्ट्र प्रांताची सचिव म्हणून व नंतर पश्चिम क्षेत्र आणि दक्षिण क्षेत्र यांची कार्यालयीन व्यवस्था व हिशोब अशी जबाबदारी होती.

रायगड जिल्ह्यामध्ये संघ कार्य हे साधारणपणे १९३६–३७च्या सुमारास सुरू झाले अगदी सुरुवातीला आर. जी. जोशी, विष्णुपंत तुळपुळे (सध्या कार्यरत असलेले गिरीश तुळपुळे यांचे वडील) इत्यादी कार्यकर्त्यांनी सुरू केले, पैकी श्री जोशी सर हे त्यावेळच्या कुप्रसिद्ध रामदास बोट अपघातामध्ये निधन पावले. सुरुवातीच्या काळामध्ये संघकार्य हे प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षकांचे मदतीने सुरू झाले, तेव्हा शिक्षण संस्था या प्रामुख्याने काँग्रेस किंवा शेकापक्षाच्या ताब्यात होत्या. त्यांना शिक्षकांनी संघाचे काम केलेले आवडत नसे. म्हणून अशा शिक्षकांच्या वरचेवर बदल्या होत असत, पण हे शिक्षक इतके निष्ठावान होते की जेथे बदली होईल तेथे नव्याने संघ कार्य सुरू होत असे. त्यामुळे त्यांच्या बदल्या या कार्यसाठी ईष्टापत्तीच ठरत असत. अगदी सुरुवातीला सध्या रायगड जिल्ह्यामध्ये असलेले पनवेल, उरण, कर्जत व खालापूर हे चार तालुके ठाणे जिल्ह्यामध्ये होते. साधारण १९७०चे आसपास ते रायगड जिल्ह्यामध्ये जोडले गेले. तेव्हा विभागही खूप मोठा म्हणजे मुंबई ठाणे व रायगड असे सर्व मिळून एक मुंबई विभाग होता. सुरुवातीला दामूआण्णा टोकेकर हे विभाग प्रचारक होते तसेच नाशिकचे राजाभाऊ गायधनी हे विभाग कार्यवाह होते. कल्याचे मुकुंदराव वझे हे देखील काही काळ विभाग कार्यवाह होते. १९४८ झालेल्या संघबंदीमध्ये पेणचे असे दिवाकर तथा आप्पा डेरे तसेच श्री राजाभाऊ देवधर रोह्याचे परशुरामपंत भावे, अलिबागचे विष्णुपंत तुळपुळे, महाडचे श्री मामा गांगल इत्यादी मंडळी जेलमध्ये होती असे स्मरते. उरणचे श्री. गोपाळराव येरकुंटवार यांना डॉ. हेडगेवार यांनी मुंबईत शाखा सुरू करण्याची प्रेरणा दिली होती असा उल्लेख सापडतो. अगदी सुरुवातीचे काळात पेणमध्ये राजाभाऊ व वामनराव देवधर बंधू आप्पासाहेब डेरे, हरिश्चंद्र भोईर गणपतराव साठे व नंतरचे काळात मधुकरराव फाटक, नरहरी तथा आबा मुळे, बापूराव परांजपे इत्यादी कार्यकर्ते होते. अलिबागमध्ये डॉ. एकनाथ गोरे, श्री लक्ष्मण तथा दादा वारडे, परशुरामपंत भावे, गोविंदराव पाटील चिंचोटी, श्री. जनार्दन पाटील काचळी, काकासाहेब वैद्य. (लष्कर प्रमुख श्री अरुणकुमार वैद्य यांचे काका), मुरुडमध्ये जोशी काका. डॉ. पेंडसे, श्री. ठाकूर (डॉ. अमर बहादूर सिंग यांचे वडील) रोहा येथे श्री. गोविंदराव भावे, श्री. जनूभाऊ आठवले, श्री. वैद्य, पाली येथे श्री बाळकृष्ण मराठे, डॉ. पुरोहित, जांभूळपाडाचे बाबा अभ्यंकर, माणगावला ॲड. आबासाहेब ओक, महाडला राजाभाऊ धारप, पंडितराव पिंपूटकर, सुभाषशेठ चांदे इत्यादी मंडळी आठवतात. त्या काळामध्ये गटनायक ही एक महत्त्वाची जबाबदारी असायची. स्वयंसकाचे रूपांतर कार्यकर्त्यांमध्ये होण्याची प्रक्रिया ही घटनायक या पदांनी होत असे आणि घटनायकांच्या जडणघडणीला खूप महत्त्व दिले जायचे. माझे आठवणीप्रमाणे आमचे त्यावेळचे विभाग कार्यवाह श्री राजाभाऊ गायधनी यांनी आमच्या हनुमान सायं शाखेच्या घटनायकांची बैठक घेतली होती आणि घटनायका बरोबर गटातल्या एक–दोन बाल स्वयंसेवकांकडे संपर्कही केला होता. दर आठवड्याला शाखा स्तरावर घटनायकांची एक बैठक होत असे. पेणला शाखेतील स्वयंसेवकांच्या जडणघडणीमध्ये ज्याप्रमाणे प्रचारकांची भूमिका असायची, तसेच एका कार्यकर्त्यांची होती, त्यांचे नाव अविनाश निळकंठ उर्फ बाळासाहेब दामले. हे सातारचे होते, व्यवसायानिमित्त दोन–तीन वर्षे पेणला होते. त्यांनी बाल तरुण स्वयंसेवकांना अक्षरशः वेड लावले होते. महत्त्वाच्या घटना १) साधारणपणे १९०६२ –६३चे आसपास गोंधळपाडा तालुका अलिबाग येथे बाल व तरुणांचे हेमंत शिबिर झाले होते, साधारणपणे ४०० चे आसपास संख्या असेल. गोरेगावचे आर.पी. जोशी हे जिल्हा कार्यवाह होते आणि त्यांनी शिबिरार्थींना पेढे वाटले होते, कारण काय तर एकूणच रायगड जिल्हा हा कामाचे दृष्टीने खडकाळ मानला जात असे ,त्यामध्ये येथे त्या आधी असलेले जिल्हा प्रचारक श्री भास्कर तथा तात्या कुलकर्णी यांची नुकतीच रायगड जिल्ह्यातून डायरेक्ट आसामला नियुक्ती झाली होती .त्यांनी असे म्हटले होते की जिल्ह्यात जर ३०० स्वयंसेवकांचे शिबिर झाले तर मी पेढे वाटेन. म्हणून त्यांचा शब्द म्हणून हे पेढे वाटप झाले होते.

**प्रांतिक शिबिर :** सन १९६८ला चिंचवड येथे महाराष्ट्र प्रांताचे पहिले प्रांतिक शिबीर झाले होते, त्याला सुमारे दहा हजार एवढे अशी पूर्ण गणवेशात उपस्थिती होती. त्याला रायगड जिल्ह्यातून बावीस गावातून सुमारे दीडशे स्वयंसेवक उपस्थित होते.

### शिवसंदेश पत्रिका वितरण

१९७४ साली शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३०० वर्षे पूर्ण झाल्याचे निमित्ताने त्यावेळेचे प्रांत संघचालक माननीय बाबाराव भिडे यांनी एक विलक्षण कार्यक्रम आखला. त्यांनी शिवाजी महाराजांची सचित्र माहिती असलेले एक पत्रक कम फोल्डर तयार केले व संघ योजनेतून महाराष्ट्रामध्ये प्रत्येक घरामध्ये पोहोचेल असा आग्रह धरला. प्रांतातील एक ज्येष्ठ प्रचारक श्री. अनंतराव देवकुळे यांच्याकडे त्याची जबाबदारी सोपवली. मी तेव्हा नुकताच महाडला नोकरीचे निमित्ताने आलो होतो. अनंतरावांचा महाडला प्रवास झाला. सहा, सात कार्यकर्त्यांसमोर बैठक झाली. किती पत्रके लागतील अशी चर्चा झाली. आम्ही कार्यकर्ते आणि त्यांची ताकद याचा अंदाज घेता ५०००चा आकडा सांगितला. अनंतरावानी आमची उलट तपासणी घेतली. तालुक्यातील गावे, मोठी गावे, छोटी गावे वाड्या वस्त्या अंदाजे घरांची संख्या इत्यादी गोष्टींची चर्चा झाली. आमची काहीच तयारी नव्हती. ते म्हणाले, पहिला हप्ता म्हणून पन्नास हजार पत्रके पाठवून देतो, नीट रचना करा, योजना करा, पुढच्या हप्त्यात आणखी ५० हजार पत्रके येतील, आम्हाला शब्दशः घाम फुटला. मग कागदावरची योजना सुरू झाली. पोस्टमन प्रत्येक गावामध्ये प्रत्येक घरामध्ये जातो, तसेच महाड शहरांतून तालुक्यांतील अनेक गावांमध्ये प्राथमिक शिक्षक नोकरीसाठी जायचे त्यांचे शाळेमध्ये आसपासच्या दोन–तीन वस्त्यांमधून विद्यार्थी येत असतात त्यांचा शोध सुरू झाला स्वयंसेकांचे गट करणे सुरू झाले. शनिवारी ऑफिस सुटले पासून सोमवारी ऑफिसला जाईपर्यंत कसे कसे रांकेमध्ये एकेका गावी जाता येईल याचा नकाशा तयार केला गेला. आम्ही तीन तीन चार चार गटाने सलग सहा सात गावी प्रवास करत असू. तेव्हा फार वाहने नव्हती. बसने एका गावी जाणे, तेथून चालत एकेका दिवसाला वीस बावीस किलोमीटर चालणे होत असे, दोन तीन महिने झाले दुसरा कोणताही विषय नव्हता ,लाखभर पत्रके ही कमी पडली होती. आपल्याला समाजदर्शन व्हावे आपल्या कामाचा विस्तार किती होणे गरजेचे आहे त्याचा या निमीत्ताने अंदाज आला.



### ज्येष्ठ नेत्यांचा शाखा प्रवास

नेमक्या तारखा लक्षात नाहीत पण मी महाडला होतो तेथे दक्षिण क्षेत्राचे क्षेत्र प्रचारक असलेले श्री यादवराव जोशी तसेच भारतीय मजदूर संघाचे संस्थापक श्री दत्तोपंत ठेंगडी यांचाही शाखेवर बौद्धिक वर्ग झाला होता. (नंतर त्यांचे म्हणजे बौद्धिक वर्गाचे पुस्तकही प्रकाशित झाले होते). तेव्हा सरकार्यवाह असलेले श्री माधवराव मुळे यांचाही जिल्ह्यात प्रवास झाला होता.

### १९८३ सालचे तळजाई शिबीर

संघाच्या शक्तीची स्वयंसेवकांना अनुभूती यावी आणि समाजाला संघाच्या शक्तीचे दर्शन व्हावे या हेतूने एक विशाल प्रांत स्तरावरचे शिबिर घेण्याची कल्पना माननिय प्रांत संघचालक बाबाराव भिडे यांनी मांडली होती. एवढ्या मोठ्या शिबिराची व्यवस्था संभाळणे, त्यासाठी आवश्यकती मोकळी जागा,पुन्हा सगळ्या प्रांतामध्ये (विदर्भ वगळून) मध्यवर्ती अशा जागेचा शोध सुरू झाला आणि पुणे महानगरपालिकेला लागून असलेली थोडीशी टेकडीवर असलेली, सुमारे २२५ ते २५० एकर एवढे विस्तीर्ण क्षेत्र उपलब्ध असलेली, टेकडीवर असलेली जागा उपलब्ध केली गेली. १९८२च्या फेब्रुवारी– मार्चपासूनच शिबिराचे निमित्त बैठका सुरू झाल्या. माननीय बाबाराव भिडे व श्री. तात्या बापट या जोडीचा प्रत्येक जिल्ह्यात प्रवास झाला, प्राथमिक बैठकीत काही गोष्टी नक्की झाल्या. एक) शिबिर तरुणांचे होईल. २) पूर्ण गणवेश आवश्यक. ३) पूर्ण ६० तासांचे निवासी शिबिर होईल. ४) तसेच शिबिर शुल्क रुपये २५ (तेव्हा २५ रुपये सुद्धा चांगली मोठी रक्कम होती.), पण माननीय बाबाराव भिडे यांचा हट्ट आणि कार्यकर्त्यांचे परिश्रम यांना यश आले आणि ३५००० उपस्थितीमध्ये शिबिर पार पडले. आपल्या रायगड जिल्ह्यातूनही सुमारे ८४ गावातून ९६० चे आसपास स्वयंसक सहभागी झाले होते. शिबिर हे दिनांक १४, १५ व १६ जानेवारी १९८३ या तारखांना होते, म्हणजेच पहिल्या दिवशी मकर संक्रमणाचा उत्सव होता आणि पुणेकरांनी जेवणात गुळाची पोळी देण्याची योजना आखली होती .पुणे शहरातून सुमारे ८५ हजार पोळ्या गोळा करणे ही योजना आखली होती. शहराचे प्रत्येक गल्ली गल्ली मधून अपार्टमेंट मधून नगरां मधून शिबीर स्थानी पोळ्यांचा अक्षरशः पाऊस पडला होता. त्यामुळे सुमारे लाखभर गुळाच्या पोळ्या गोळ्या झाल्या होत्या. अनेकांचा त्या शिबिराचे निमित्तानेच संघ प्रवेश झाला होता, तेथील व्यवस्था, कार्यक्रम, शिस्त व भव्यता पाहून ते धन्य होत होते.

### जिल्ह्याचे विभाजन

जिल्ह्याला असलेली भरपूर लांबी व कमी रुंदी लक्षात घेता विविध बैठकांना सर्वांची उपस्थिती राहत नसे, हे लक्षात घेऊन दोन जिल्ह्यांची निर्मिती करण्याचा विषय सन १९८२पासून सुरू होता. दोन वर्षे सुरुवातीला सर्व प्रकारच्या बैठका दोन भागात घेण्याचा सराव सुरू केला, दोन जिल्हा कार्यकारण्या तयार करण्याचाही प्रयत्न सुरू होता. प्रत्यक्षामध्ये जून १९८४पासून पूर्ण रायगड जिल्ह्याचे रायगड व कुलाबा असे दोन जिल्हे तयार केले गेले. उत्तरेकडचे सात तालुके उरण पनवेल कर्जत खालापूर पेण अलिबाग मुरुड यांना कुलाबा जिल्हा म्हणून नाव दिले गेले व दक्षिणेकडचे सात तालुके म्हणजे रोहा, माणगाव, पाली, महाड, पोलादपूर, म्हसळा व श्रीवर्धन याला रायगड जिल्हा म्हणून नाव दिले गेले, नंतरच्या काळात मुरुड तालुका हा कुलाबा जिल्ह्याचे ऐवजी रायगड जिल्ह्यात समावेश करण्यात आला.

### संघाची कार्यालये

प्रवासी कार्यकर्ते तसेच प्रचारकांच्या निवासासाठी आणि संघाचे म्हणून जे साहित्य असते ते ठेवण्यासाठी कार्यालयाची गरज पडतच असे. पूर्वी घरे मोठमोठी असल्यामुळे कार्यकर्त्यांच्या घरी प्रचारकांची निवास व्यवस्था होत असे, तरी पण छोट्या मोठ्या बैठका कार्यक्रम इत्यादीसाठी जागा लागतच होती. आणीबाणी नंतर हळूहळू परिस्थिती बदलली, संघाला समाजात मान्यता व प्रतिष्ठा मिळत गेली. आर्थिक ताकद उभी करणे आवाक्यात वाटू लागले, तस तशी महाड अलिबाग पनवेल कर्जत वगैरे ठिकाणी कार्यकर्त्यांनी एखाद्या अपार्टमेंट मध्ये एखादा ब्लॉक नक्की करून संघाचे कार्यालय सुरू झाले. जिल्ह्याचे विभाजन झाल्यावर कुलाबा जिल्ह्यासाठी पेण हे मध्यवर्ती ठिकाण झाले. जिल्ह्याच्या व अन्य मोठ्या बैठका घेणे हे अडचणीचे होऊ लागले, तेव्हा पेणला जिल्ह्यातील सगळ्यात मोठे कार्यालय मिळवण्यात संघाला यश आले, आता बहुतेक तालुका पातळीवर संघाचे स्वतचे (म्हणजेच वेगवेगळ्या ट्रस्टचे) कार्यालय उपलब्ध आहे.

### माननीय मोरोपंत पिंगळे अमृत महोत्सवी कार्यक्रम

मोरोपंत पिंगळे यांनी १९९४ साली वयाचे ७५ वर्षे सुरू केले, ते बराच काळ महाराष्ट्राचे प्रांत प्रचारक होते, त्यानिमित्ताने प्रत्येक जिल्ह्यामध्ये या निमित्ताने मोरोपंतांच्या सत्काराचा कार्यक्रम होता .रायगड व कुलाबा या दोन्ही जिल्ह्यांच्या तर्फे नागोठणा येथे त्यांचा सत्काराचा कार्यक्रम झाला. त्यावेळचे प्रांत सहकार्यवाह श्री सुरेंद्र थत्ते यांनी मोरोपंतांच्या जीवनातील महत्त्वाचे पहिले पैलू विषद करून सांगितले.

### डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी

सन १९८९ हे वर्ष संघ संस्थापक डॉक्टर हेडगेवार यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून सर्व देशभर साजरे करण्याचे ठरले होते ,याचे एक कारण असे की संघ जरी समाजाला हळूहळू माहित होऊ लागला होता तरी संघ संस्थापक डॉ. हेडगेवार लोकांना फार परिचीत नव्हते, त्यामुळे जन्मशताब्दीचे निमित्ताने अनेक जाहीर कार्यक्रम, एखाद्या चौकाला वा रस्त्याला डॉक्टरांचे नाव देणे ,अनेक संस्थांमध्ये डॉक्टरांच्या प्रतिमेचे अनावरण करणे. इत्यादी कार्यक्रम योजणेत येत होते .या निमित्याने सेवा कार्य चालवण्यासाठी एका मोठ्या कॉरपस् फंडाची उभारणी करण्याचाही प्रयत्न होता, जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी छोटे मोठे कार्यक्रम झाले. सांगता समारंभाचा कार्यक्रम पेणला झाला त्याला त्या वेळच्या भाजपाचे जेष्ठ नेते श्री जगन्नाथराव जोशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

### मंडल स्थानिक शाखा

१९९५चे आसपास (साल नेमके आठवत नाही) सर्व प्रांत भर एकाच वेळी सर्व मंडळ स्थानी शाखा लागली पाहिजे असा कार्यक्रम दिला गेला, आणि तो खूप आग्रहपूर्वक राबवला गेला, तेव्हा कुलाबा जिल्ह्यात ६४ मंडले होती आणि सर्व स्थानी त्या दिवशी एक तासाची शाखा लावणे मध्ये आपण यशस्वी झालो होतो. तालुका पातळीपर्यंत अडकलेले संघाचे काम यानिमित्ताने ग्रामीण भागात पोहोचण्यास यामुळे खूप मदत झाली.

### रामजन्मभूमीमुक्ती आंदोलन

या दोन वर्षी राम जन्मभूमी मुक्ती आंदोलनामध्ये झालेल्या कार सेवा, तसेच तत्पूर्वी झालेल्या शीला पूजन कार्यक्रमांमध्ये ,जरी हे कार्यक्रम विश्व हिंदू परिषदेच्या नेतृत्वात आले असले तरी संघाने आपली पूर्ण शक्ती यामागे लावली होती .अगदी आपल्या दैनंदिन शाखांकडे दुर्लक्ष करून सुद्धा स्वयंसेवक व कार्यकर्ते या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते

### जिल्ह्यात पतसंस्थांची निर्मिती

जिल्ह्यातील एकूणच राजकारण, सहकारी संस्था, बँका, या काँग्रेस व शे का पक्षाचे ताब्यात असल्यामुळे स्वयंसेवकांना वा त्यांच्या सहानभूतीदारांना छोट्या छोट्या आर्थिक गरजांसाठी सुद्धा अडवणुकीला सामोरे जावे लागत असे, हे लक्षात घेऊन काही काही तालुक्यांमधून म्हणजे उरण पनवेल कर्जत पेण अलिबाग मुरूड रोहा महाड इत्यादी ठिकाणी पतसंस्थांची उभारणी केली गेली ,यापैकी अनेक आजही चांगल्या पायावर उभ्या आहेत, काही मात्र अडचणीमुळे बंद झाल्या.

**–विनायक जोशी**
(पेण, जि. रायगड)




## कळंबोलीत तिरंगा यात्रेला प्रतिसाद; अनेकांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हर घर तिरंगा अभियानाला प्रतिसाद देत कळंबोली येथे गुरुवारी तिरंगा स्वाभिमान पदयात्राचे भव्य आयोजन करण्यात आले. या यात्रेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. कळंबोली मंडळ अध्यक्ष अध्यक्ष अमर अरुण पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा काढण्यात आली. यामध्ये कळंबोलीतील सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, शिक्षक आणि राजकीय नेते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, संदीप म्हात्रे, मंडळ सरचिटणीस दिलीप बिस्ट, बबन बारगजे, महिला अध्यक्ष मनिषा निकम, जिल्हा उपाध्यक्ष महिला मोर्चा प्रिया मुकादम, माजी नगरसेवक बबन मुकादम, रविंद्र भगत, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, युवा नेता अमर ठाकूर, सुनिल ढेंबरे, विनोद बोरसे, बशीर शेख, केशव यादव, निलेश भोईर, सचिव राजेंद्र बागल, उपाध्यक्षा सुनीता हिवराळे, प्रभाग अध्यक्ष घनश्याम शर्मा, प्रकाश शेलार आणि युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पदयात्रेतील सहभागी नागरिकांनी हातात तिरंगा ध्वज घेत भारत मातेचा जयघोष केला.





**उलवे नोड : सेक्टर ९ येथे नव्याने लोटस हॉस्पिटल नव्याने सुरु झाले आहे. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून या हॉस्पिटलचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी त्यांनी डॉ. स्वप्नील गोसावी आणि डॉ. स्मिता गोसावी यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. उद्घाटनावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी.देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत, वहाळ ग्रामपंचातीचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, पोलीस निरीक्षक अर्जुन राजणे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



पनवेल : स्वातंत्र्य दिनानिमित्त तालुका क्रीडा संकुलात प्रांत अधिकारी पवन चांडक यांच्याहस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. या समारंभाला भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, जयंत पगडे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, तेजस कांडपिळे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, आदी उपस्थित होते. दरम्यान, क्रीडा सुंकलात विविध औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.




कामोठे : येथील आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त व्यापारी सेलचे अध्यक्ष नाना मगदूम यांच्या हस्ते आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. या वेळी भाजप कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, चिटणीस विद्या तामखडे, भाऊ भगत, हर्षवर्धन पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, प्रवीण कोरडे, वर्षा शेलार, वनिता पाटील, सुरेखा लांडे, हरजिंदर कौर, सोनाली खरटमोल, अक्षरा माने, फातिमा आलम, प्रिया ठोकळे, दामोदर चव्हाण, छबीदास क्षीरसागर, मोहन जोशी, सुरेंद्र हळदीकर, आदित्य भगत, किरण जाधव, विकास टेकवडे ,गोपीनाथ गोवारी, शुभम कांबळे आणि नागरिक उपस्थित होते.




## सजला श्रावण

आला आला आला श्रावण
जलधारा बघ बरसू लागल्या
नभावरी सप्त रंगाचा
इंद्रधनु बघ मोहक साजला

हिरवी शाल पांघरूनी
धरती बघ ना दिसते नवरी
सुगंध मातीचा मोहिनी घाली
अवघी धरती शहारून आली

सण वरांनी मास बहरला
पूजा आर्चा सुरू जाहल्या
भगवंताचा समीप जाया
सख्या सजणी तयार झाल्या

आला आला आला श्रावण
प्रसन्नतेला आला मोहर
शुभ्र पवित्र मास श्रावण
मनात पालवे जसा गुलमोहर



–पल्लवी अजय कोळी, ठाणे

रविवार, १७ ऑगस्ट २०२५ राम प्रहर


# शासकीय योजनांद्वारे जनतेची सेवा करा

## खासदार धैर्यशील पाटील यांचे आवाहन; कार्डियेक रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**रोहा : प्रतिनिधी**

शासन वेगवेगळ्या योजना राबवित असते. या योजना सामाजिक भावनेने कार्यकर्ते लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्न करीत असतात. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, दोन्ही उपमुख्यमंत्री नागरिकांसाठी योजना आणत आहेत. या योजनांच्या माध्यमातून लोकांची सेवा करा, असे आवाहन खासदार धैर्यशील पाटील यांनी केले.



आरसीएफ थळ सीएसआर अंतर्गत सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानला देण्यात आलेल्या कार्डियेक रुग्णवाहिकेचा लोकार्पण समारंभ रोहा येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात झाला. त्या वेळी खासदार पाटील बोलत होते.

या समारंभास आमदार महेंद्र दळवी, शिवसेना जिल्हाध्यक्ष प्रमोद घोसाळकर, अनंता गोंधळी, पोलीस निरीक्षक मारूती पाटील, ज्येष्ठ नेते नितीन तेंडुलकर, सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोशन चाफेकर, भाजप तालुका अध्यक्ष महेश ठाकूर, रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, देवेंद्र तावडे, उद्देश वाडकर, शैलेश रावकर, वैभव कुलकर्णी, किरण कानडे, परेश चितळकर आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार महेंद्र दळवी म्हणाले की, संस्था टिकवणे जिकिरीचे काम आहे. ते तुम्ही काम करीत आहेत. त्यामुळे असेच काम करीत संस्था पुढे घेऊन जात जा. माझ्या तालुक्यातील सीएसआर रोह्याला येतो हे माझे भाग्य समजतो. आम्ही जनसेवा केली आहे. म्हणून आम्हाला राजकीय व सामाजिकदृष्ट्या लोकांनी स्वीकारले आहे. आजचा कार्यक्रम लोकसेवेचा आहे. अशाच पध्दतीची लोकसेवा तुमच्या हातून घडो.

प्रास्ताविकात रोशन चाफेकर यांनी सांगितले की, सामाजिक संस्थेची स्थापना १२ जानेवारी २०१७ साली स्वामी विवेकानंद जयंती आणि मांसाहेब जिजाऊ जयंती दिवशी झाली. २०१७ ते २०२५ खऱ्या अर्थाने सामाजिक संस्थेचा प्रवास आहे. संस्था स्थापन करणे सोपे, पण टिकवणे कठीण असते. अनेक संकटना तोंड देत आज काम चालू असून सक्रिय १५० सदस्य आहेत.

अमित घाग, मिलिंद अष्टीवकर यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी तालुक्यातील वाखोण्यजोगे काम करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# खोपोलीत तिरंगा रॅली

## असंख्य नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**खोपोली : प्रतिनिधी**

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाची पाळे-मुळे नष्ट करण्यासाठी भारतीय लष्कराने केलेले ऑपरेशन सिंदूर पूर्णपणे यशस्वी ठरले. या कामगिरीचा प्रत्येक भारतीय नागरिकाला अभिमान वाटतो आहे. शूर सैनिकांच्या सन्मानार्थ १४ ऑगस्ट रोजी खोपोली शहरात तिरंगा यात्रा काढण्यात आली होती. यामध्ये नागरिकांनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिळफाटा येथील अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तिरंगा रॅलीला सुरुवात करण्यात आली. खालची खोपोली येथून निघालेल्या तिरंगा यात्रेत भारत माता की जय, वंदे मातरम्, आशा जय घोषणांनी बाजारपेठ दणाणून गेले. या तिरंगा रॅलीचा समारोप विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी प्रमुख वक्ते भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांनी उपस्थितांना संबोधित केले. जिल्हा उपाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी सिंदूर रॅली आणि या संदर्भातील आयोजित कार्यक्रमांची माहिती दिली. माजी नगराध्यक्ष सुनील पाटील यांनीदेखील विचार मांडले. प्रस्ताविक भाजप खोपोली शहर अध्यक्ष राहुल जाधव यांनी केले.

युवा उद्योजक विक्रम साबळे, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, माजी नगरसेवक राजेंद्र फक्के, सूर्यकांत देशमुख, इंदरमल खंडेलवाल, हरीश काळे, अविनाश तावडे, माजी नगरसेविका अपर्णा मोरे, अनिता शाह, शिळफाटा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजू अभाणी, शिळफाटा ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष अमोल शहाणे, बूजस हास्य क्लब अध्यक्ष बाबूभाई ओसवाल, रोट्रॅक्ट क्लबच्या अध्यक्ष दिना शहा, खोपोली गुरुद्वाराचे चरणजीतसिंग सैनी, बंगाली असोसिएशन अध्यक्ष विश्वजीत बिस्वास, जिल्हा कार्यकारिणी सदस्य चंद्राप्पा अनिवार, रसिका शेट्ये, अश्विनी अत्रे, अपर्णा साठे, सचिन मोरे, हेमंत नांदे, दिलीप पवार, संजय म्हात्रे, सुनील नांदे, महेश खेडेकर, हिम्मतराव मोरे, जयवंत वाघ, संदेश अभानी, किर्ती ओसवाल, ऋषिकेश म्हात्रे, सुमिता महर्षी, भारती शहा, सुप्रिया नांदे, विमल गुप्ते, विभावरी पाठक, खोपोली शहरातील सामाजिक, सेवाभावी संस्था, उर्दू माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व देशभक्त नागरिक उपस्थित होते. तिरंगा रॅलीची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. उपस्थितांचे आभार अजय इंगुळकर यांनी मानले.


तिरंगा रॅलीचे संयोजक विकास खुरपुडे, सहसंयोजक सचिन मोरे, अनिता शाह, निकेत पाटील, रोहित साठे यांनी या रॅलीचे उत्कृष्ट नियोजन केले होते.



# वावंढळ येथील पुलाच्या कठड्याला मिळाली उंची; प्रवास होणार सुरक्षित

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर खालापूर हद्दीत वावंढळवाडी गावानजीक पुलावर असलेल्या केवळ अर्धा फूट उंचीच्या संरक्षक कठड्याकडे अखेरीस महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे लक्ष गेले असून कठड्याचे बांधकाम सुरू झाल्याने प्रवासी समाधान व्यक्त करीत आहेत.



पनवेलहून खोपोलीच्या दिशेने येताना चौक ते वावंढळवाडी गावादरम्यान नदीवर वीस फूट उंचीचा पूल आहे. या पूलाच्या एका बाजूला जेमतेम अर्धा फूट उंचीचा कठडा शिल्लक आहे.

या ठिकाणी रस्त्याला वळण आणि उतार यामुळे पुलावरुन प्रवास धोकादायक बनला होता. काही वर्षापूर्वी पुलावरून एसटी नदीत कोसळून अपघात घडला होता. अनेकांना जीव गमवावा लागला होता. पुलाच्या कठड्याची उंची वाढविण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुरेश गावडे यांनी आयआरबीकडे केली होती. अखेरीस संरक्षक कठड्याची उंची वाढवण्यासाठी मुहूर्त मिळाला आहे.

# आरसीएफमधील नोकरभरतीच्या ऑनलाईन परीक्षेसाठी मार्गदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टिलाइजर्स लि. (आरसीएफ) या भारत सरकारच्या सार्वजनिक उपक्रमातील नियोजित कर्मचारी भरतीसाठी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येते. त्यासाठी उमेदवारांना मंगळवारी (दि.१९) मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

मंगळवारी सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत समृद्धी सभागृह, प्रशासकीय इमारत प्रवेशद्वार, आरसीएफ कारखाना थळ युनिट येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. ऑनलाईन अर्ज केलेले रायगड जिल्ह्याचे रहिवासी असलेले अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय गटांतील पात्र उमेदवारांना या शिबिरात प्रवेश दिला जाणार आहे. यात ऑनलाईन परीक्षेच्या संदर्भातील मार्गदर्शनासोबत संबंधित विषयांचे तज्ज्ञ अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. भरतीसंबंधी मार्गदर्शन सत्राचे वेळापत्रक उमेदवारांना त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर कळविण्यात आले आहे. उमेदवारांनी उपस्थित रहावे असे आवाहन उपमहाव्यवस्थापक प्रशांत पाटील यांनी केले आहे.

# कशेळे येथे आदिवासी भवनाचे भूमिपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कशेळे येथे सुमारे एक कोटी ५० लाख रुपयांच्या विकास निधीतून उभारण्यात येणाऱ्या भव्य आदिवासी भवनाचे भूमिपूजन खासदार श्रीरंग बारणे आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास आदिवासी बांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेश टोकरे, माजी उपसभापती मनोहर थोरवे, जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, जिल्हा संघटक संभाजी जगताप, तालुकाप्रमुख सुदाम पवाळी, संपर्कप्रमुख दिलीप ताम्हाणे, संघटक शिवराम बदे, अमोल पाटील, भास्कर दिसले, युवासेनेचे प्रसाद थोरवे, माजी नगरसेवक संकेत भासे आदी उपस्थित होते.

या वेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी आदिवासी समाजाच्या एकजुटीचे कौतुक केले. आदिवासी समाजाच्या मदतीची जाण ठेवून आमदार महेंद्र थोरवे यांनी एक ऐतिहासिक पाऊल आदिवासी समाजासाठी उचलल आहे. भविष्यात निर्माण होणाऱ्या आदिवासी भवनातून समाजातील एकोपा कायम राहील आणि आदिवासी संस्कृती ठळकपणे जगासमोर येईल, असे ते म्हणाले.

आमदार थोरवे यांनी, आदिवासी समाज हा माझी ताकद आहे. मला पुन्हा एकदा आमदार बनवण्यात आदिवासी समाजाचा मोठा वाटा आहे. आदिवासी भवन हे आमच्यासाठी मंदिरासारखे आहे. त्यांच्या संस्कृतीचा आणि एकोप्याचा गौरव जगासमोर यावा असा आमचे प्रयत्न असून त्यांच्या हक्कांसाठी आणि प्रगतीसाठी हे पाऊल उचलले आहे.

# 'कर्जतचे कृषी संशोधन केंद्र जागतिक दर्जाचे होणार'

**कर्जत : प्रतिनिधी**

भात जलद पैदास प्रकल्प, महाअन्नपूर्णा-बदलत्या वातावरणानुरूप भात पिकावरील संशोधन प्रकल्प मंजूर झाल्याने जागतिक दर्जाचे संशोधन करण्यासाठी अद्ययावत सुविधा निर्माण होतील. त्यामुळे कोकणातीलच नव्हे तर राज्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था फिलिपाईन्सकडून मोठमोठ्या नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पास मान्यता मिळत असल्याने कर्जतचे कृषी संशोधन केंद्र लवकरच जागतिक दर्जाचे भात संशोधन केंद्र होईल, असा विश्वास सहयोगी संशोधन संचालक डॉ. भारत वाघमोडे यांनी व्यक्त केला.



कर्जत प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचा वर्धापन दिनाचे आयोजन मुख्य इमारतीच्या प्रांगणात साजरा करण्यात आले होते. त्या वेळी डॉ. वाघमोडे बोलत होते. आता १४ वर्षांऐवजी ६-७ वर्षातच वेगवेगळ्या गुणवैशिष्ट्ये असलेल्या भात जाती विकसित करणे शक्य होईल. अद्ययावत भात लागवड तंत्रज्ञानदेखील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असून मोजक्याच संस्थांत व महाराष्ट्रात फक्त कर्जत येथेच हा प्रकल्प सुरू आहे, असे त्यांनी सांगितले.

कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ.रवींद्र मर्दाने यांनी १४ ऑगस्ट १९१९ रोजी स्थापन झालेल्या या संशोधन केंद्राचा देदीप्यमान इतिहास, संशोधित झालेले विविध भात वाण आणि उत्पादनातील योगदान नेटक्या शब्दात विदित केले. सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी व मजूर वर्गाने समर्पित भावनेने काम केल्यास केंद्राचा नावलौकिक जगभरात पोहचेल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ऐतिहासिक वारसा असलेल्या संशोधन केंद्राच्या मुख्य इमारतीतील कोनशिलेचे पूजन केल्यावर डॉ. वाघमोडे यांनी डॉ. बाळासाहेब सावंत यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. उपस्थितांनीही पुष्पांजली अर्पण करीत विनम्र अभिवादन केले. यानिमित्ताने ३९वे सहयोगी संशोधन संचालक डॉ. वाघमोडे यांचा कृषिविद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर यांनी सर्वांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी संशोधन केंद्रातील सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी व उपस्थितांना पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला.

# मोरे महाविद्यालयाचा प्रशिक्षण सत्रात सहभाग



**रोहा : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागातर्फे प्रथम सत्र २०२५-२६मधील कार्यक्रम अधिकारी आणि विद्यार्थी प्रशिक्षण कार्यक्रम १४ ऑगस्ट रोजी द.ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे आयोजित करण्यात आला. मोरे महिला महाविद्यालयाच्या प्राध्यापिका आणि विद्यार्थिनींनी प्रशिक्षणात सहभाग घेतला.

आजीवन अध्ययन म्हणजे शिक्षण केवळ औपचारिक शाळेच्या किंवा महाविद्यालयीन अभ्यासक्रमांपुरते मर्यादित नसून आयुष्यभर चालू राहणारी प्रक्रिया आहे. यात नवीन ज्ञान आणि कौशल्ये मिळवण्यासाठी सतत प्रयत्न करणे, व्यावसायिक आणि व्यक्तिगत विकासासाठी प्रयत्न करणे आणि बदलत्या जगासोबत जुळवून घेणे यांचा समावेश होतो. या कार्यशाळेत रायगड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागांतील प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधीनींना वर्ष २०२५-२६साठी प्रकल्प कार्य आणि पोर्टल वरील कामकाजाबाबत माहिती देण्यात आली.

मोरे महिला महाविद्यालयातील प्रा.शिल्पा खाडे तसेच स्वामिनी महाडिक, रिया जाधव या विद्यार्थिनींनी प्रशिक्षण सत्रात सहभाग घेतला.

# मुरुड पोलीस ठाण्यात शांतता समितीची सभा

**मुरुड : प्रतिनिधी**

आगामी सण-उत्सव शांततामय वातावरणात सौहार्दाने साजरे व्हावेत तसेच कुठेही कायदा सुव्यवस्थेचा भंग होणार नाही या उद्देशाने मुरुड पोलीस ठाण्यातर्फे शांतता समितीची सभा तहसीलदार आदेश डफळ यांच्या अध्यक्षतेखाली दर्यासारंग सभागृहात झाली.



या सभेस पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, वासंती उमरोटकर, अरविंद गायकर, मुसद्दीक कादिरी, नयन कर्णिक, नैनिता कार्णिक, घन:शाम श्रीवर्धनकर, जाहिद फकजी, पांडुरंग आरेकर, नांदगाव सरपंच शेजल घुमकर, दिनेश मिणमिने आदींसह शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे पदाधिकारी उपस्थित होते.

या शांतता समितीची सभेमध्ये मंगेश दांडेकर यांनी, मुरुड या पर्यटनस्थळी येणाऱ्या भंगारवाले आदी परप्रांतीयांची नोंद व्हावी, बाजारपेठेत पार्किंगची व्यवस्था व्हावी तसेच शांतता समितीच्या सदस्यांच्या सूचनांची कार्यवाही व्हावी, अशी मागणी केली. गणेशोत्सवात विक्रम रिक्षांना योग्य ठिकाणी वाहनतळ मिळावे जेणेकरून रहदारीला अडथळा होणार नाही, अशी मागणी अविनाश दांडेकर यांनी केली.

गणपती कारखानदारांना थोडेच दिवस मिळणार असल्याने भारनियमन टाळून विद्युत पुरवठा खंडित होणार होऊ नये तसेच शाडू मातीच्या गणेशमूर्तींना आगमन व विसर्जनप्रसंगी शहरातील खड्डे भरण्याची मागणी बाबु सुर्वे यांनी केली. मुरुड शहरात जातीय सलोखा टिकून राहण्यासाठी हिंदू, मुस्लीम समाजाने पुढाकार घ्यावा तसेच धर्मवेड्या लोकांना वेळीच आवर घालण्याचे नम्र आवाहन प्रमोद भायदे यांनी केले. मुस्लिम समाजाचे शकील कडू यांनी या पुढे अशा प्रकारची कोणतीही कृती शहरात आम्ही घडू देणार नाही याची ग्वाही दिली.

शहरात नादुरुस्त सीसीटीव्ही कॅमेरे, मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण आदी समस्यांची यादीच शांतता समितीच्या सदस्यांनी पोटतिडकीने मांडून प्रशासनाने कार्यवाही करावी अशी आग्रही मागणी केली.

या वेळी मुरुड पोलीस ठाण्याचे निरीक्षक परशुराम कांबळे यांनी मार्गदर्शन करताना मुरुडचा मागील प्रकरणाचा विषय राज्य स्तरावर गेला आहे. सर्व नागरिकांनी सामाजिक सलोखा राखला पाहिजे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर गुन्हेगाराविषयी कुठलीही दयामाया दाखवली जाणार नाही, असे निक्षून सांगितले. पोलीस यंत्रणा आपल्या सेवेसाठी २४ तास तत्पर आहे. आगामी उत्सव-सण गुण्यागोविंदाने साजरे करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात तहसीलदार आदेश डफळ यांनी सदस्यांच्या भावनांचा आदर करीत संबंधित अधिकाऱ्यांनी या लोक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सक्त निर्देश दिले. काही व्यक्तींकडून आपला वापर गैर कामासाठी केला जाणार नाही या विषयी सर्तकता राखावी, असेही तहसीलदारांनी केले.

# आरडीसीएच्या संकेतस्थळाचे अनावरण



**अलिबाग : प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र दिनाच्या औचित्याने आणि माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) नव्या संकेतस्थळाचे व खेळाडूंसाठी देण्यात येणाऱ्या ओळखपत्राचे अनावरण करण्यात आले. www.raigaddistrictcricketassociation.com या नावाने अद्ययावत अशी वेबसाईट उपलब्ध झाली आहे.

आमदार रविशेठ पाटील यांच्या निवासस्थानी एका शानदार कार्यक्रमाद्वारे या संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले या वेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. हे नवीन संकेतस्थळ रायगड जिल्ह्यातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक, पालक, पंच गुणलेखक व क्रिकेटप्रेमींना वापरासाठी सुलभ करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर रायगड जिल्ह्यातील क्रिकेट संबंधित असोसिएशनकडील सर्व माहिती सर्वांसाठी सहज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचबरोबर जिल्ह्याच्या विविध वयोगटांच्या संघ निवडीसाठी नेमलेल्या सिलेक्टरची नावे व त्यांनी निवडलेला संघ आणि संघाबरोबर दौऱ्यावर जाणाऱ्या टीम मॅनेजर याची अद्ययावत माहिती मिळणार आहे.

याशिवाय आरडीसीएच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध वयोगटातील व खुल्या गटातील मुला-मुलींच्या क्रिकेट स्पर्धा-सामन्यांचे वेळापत्रक, खेळाडूंचे, पंच व गुणलेखकांचे रजिस्ट्रेशन, जिल्ह्यातील क्रिकेट खेळामध्ये प्राविण्य मिळवलेल्या व क्रिकेटच्या प्रगती व विकासामध्ये योगदान देणाऱ्या लोकांची माहिती उपलब्ध होणार आहे. संकेतस्थळ अनावरणाच्या कार्यक्रमाप्रसंगी आमदार रविशेठ पाटील यांनी आरडीसीएच्या नवीन कमिटीच्या कामाचे कौतुक केले आहे.

कार्यक्रमास आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, खजिदार प्रशांत ओक, सदस्य कौस्तुभ जोशी, ॲड.पंकज पंडित, प्रदीप खलाटे, मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी, शेखर भगत, किशोर गोसावी, प्रदीप साळवी, रोहित कार्ले, अभिषेक खातू, प्रवीण आंद्रे यांच्यासह क्रिकेट असोसिएशनचे खेळाडू व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

अद्ययावत संकेतस्थळ तयार करण्यासाठी एजीसी इमेजिंग सोलूशनसचे उ.प. चव्हाण व गणेश दिलीप शिंदे यांनी परिश्रम घेतले असल्याने त्यांचे आरडीसीएच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# पनवेल महापालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे पनवेल महानगरपालिका आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच नवीन पनवेलच्या सिडको समाजमंदिरात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेस खेळाडूंचा प्रतिसाद लाभला.

रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष व आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस प्रशिक्षक संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या मुलांच्या स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभास पनवेल तालुका क्रीडा अधिकारी सुचिता ढमाळे उपस्थित होत्या. मुलींच्या स्पर्धेचे उद्घाटन असिस्टंट कलेक्टर श्री. कासार व पनवेल महापालिका क्रीडा अधिकारी हरेश जाधव यांच्या हस्ते झाले.

संजय कडू यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी समीर रेवाळे, शामल डेबार्मा आणि विजय ठिक यांनी मेहनत घेतली.

**गटनिहाय निकाल**

१४ वर्षाखालील मुली : प्रथम बालभारती पब्लिक स्कूल खारघर, द्वितीय डीएव्ही इंटरनॅशनल स्कूल खारघर, तृतीय सीकेटी स्कूल नवीन पनवेल, मुले : प्रथम बालभारती पब्लिक स्कूल खारघर, द्वितीय एपीजे स्कूल खारघर, तृतीय सेंट जोसेफ खांदा कॉलनी; १७ वर्षाखालील मुली : प्रथम क्रमांक डीएव्ही स्कूल खारघर, द्वितीय डीएव्ही स्कूल नवीन पनवेल, तृतीय एपीजेस्कूल खारघर, मुले : प्रथम बालभारती पब्लिक स्कूल खारघर, द्वितीय एपीजे स्कूल खारघर, तृतीय महात्मा स्कूल खांदा कॉलनी; १९ वर्षाखालील मुले : प्रथम बालभारती पब्लिक स्कूल खारघर, द्वितीय रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर, तृतीय डीएव्ही स्कूल खारघर, मुली : प्रथम बालभारती पब्लिक स्कूल खारघर, द्वितीय रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर, तृतीय डीएव्ही स्कूल.

# इंडियन नॅशनल ऑटोक्रॉस चॅम्पियनशिपमध्ये कुशल चौधरी अव्वल

## माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याकडून अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

फेडरेशन ऑफ मोटर स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया आयोजित इंडियन नॅशनल ऑटोक्रॉस चॅम्पियनशिप २०२४मध्ये नवीन पनवेल येथील कुशल सुरेश चौधरी याने चमकदार कामगिरी करत दोन वेगवेगळ्या श्रेणींमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. या विजयामुळे त्याने संपूर्ण स्पर्धेत भारतातूनही पहिला क्रमांक मिळवला आहे.

कुशलच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक दिलीप पाटील, विजय चिपळेकर, समीर ठाकूर, भाजपनेते भाऊ भगत, रवी गोवारी आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे टेबल टेनिस स्पर्धेत यश




**खारघर : रामप्रहर वृत्त**


पनवेल महापालिका जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच नवीन पनवेल येथील सिडको समाजमंदिरात झाली. या स्पर्धेत खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या १९ वर्षाखालील मुलींच्या टीमने सहभाग घेऊन कौशल्य दाखवत उपविजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत साधारणतः २० टीमने सहभाग घेतला होता. स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरची विद्यार्थिनी तुलिका यादव १२ ई हिने वैयक्तिक सहभाग घेतला. त्यात ती विभागीय पातळीवर निवड चाचणीसाठी पात्र ठरली

यशस्वी विद्यार्थिनी व त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक सुरज पाटील यांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारस संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी कौतुक करून अभिनंदन केले.

# जगज्जेता मेस्सी १२ डिसेंबरला भारतात येणार

## पीएम मोदी, विराट कोहलीच्या भेटीचे नियोजन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अर्जेंटीनाचा जगप्रसिद्ध फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याच्या भारत दौऱ्याला अखेर अंतिम मंजुरी मिळाली आहे. येत्या डिसेंबर महिन्यात मेस्सी भारतात येणार असून २०११नंतरचा हा त्याचा दुसरा भारत दौरा ठरणार आहे. या दौऱ्यादरम्यान तो पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विराट कोहली यांच्यासह अनेक क्रीडा आणि मनोरंजन क्षेत्रातील दिग्गजांची भेट घेण्याची शक्यता आहे.

जगज्ज्ञेत्या मेस्सीच्या तीन दिवसीय भारत दौऱ्याची सुरुवात १२ डिसेंबर रोजी कोलकाता येथून होईल. याबाबतची माहिती सताद्रू दत्ता यांनी शुक्रवारी दिली. ते म्हणाले की, मेस्सीच्या जीओएटी टूर ऑफ इंडिया २०२५ या दौऱ्याचा पहिला टप्पा कोलकाता असेल. त्यानंतर तो अहमदाबाद, मुंबई आणि दिल्ली या शहरांना भेट देईल. या दौऱ्याची सांगता १५ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी होणाऱ्या भेटीने होईल. याव्यतिरिक्त, सौरव गांगुली आणि विराट कोहली यांच्याशीही मेस्सीच्या भेटीचे आयोजन केले जाण्याची शक्यता आहे.
















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com